महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

सावदा (ता.रावेर, जि.जळगाव) ग्रामीण रुग्णालयात पुरेसा कर्मचारी वर्गासह इमारतीच्या बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(१) ५२८४ (२२-०३-२०२०). श्री. शिरीष चौधरी (रावेर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावदा (ता. रावेर, जि.जळगाव) येथील नव्याने मंजुरी दिलेल्या ग्रामीण रुग्णालयात पुरेसा कर्मचारी वर्ग नाही, तसेच नवीन इमारतीच्या बांधकामास मान्यता नसल्यामुळे सदर ग्रामीण रुग्णालय रुग्णांना सेवा देऊ शकत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सावदा ग्रामीण रुग्णालयात पुरेसा कर्मचारी वर्गासह इमारतीच्या बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१६-०६-२०२२) : (१) ग्रामीण रुग्णालय सावदा येथे वर्ग १ ते वर्ग ३ एकूण नियमित पदांपैकी ७ पदे भरलेली व ३ पदे रिक्त आहेत. तसेच कंत्राटी तत्वावरील काल्पनिक कुशल पदांपैकी ४ पदे मंजुर आहेत व काल्पनिक अकुशल पदांपैकी १५ पदे मंजुर असून ती पदे सद्यस्थितीत रिक्त आहेत. दिनांक ३०.०५.२०१९ रोजी रुग्णालयाच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे व दिनांक १६.०९.२०१९ रोजी सर बांधकामाचे कार्यारंभ आदेश दिलेले आहेत. तसेच दिनांक ०१.०७.२०१९ अन्वये रुपये २१४८.४५ लक्ष निधी मंजूर करण्यात आला आहे. सदर इमारतीचे बांधकाम सुरु असून सध्या उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नगरपालिकेच्या इमारतीमध्ये रुग्णांना रुग्णालयीन सेवा देण्यात येत आहेत.

(२) रुग्णालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत दिनांक ०१.०७.२०१९ अन्वये रुपये २१४८.४५ लक्ष निधी मंजुर करण्यात आला आहे. तसेच दिनांक १६.०९.२०१९ रोजी सदर बांधकामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे व बांधकामास सुरवात झालेली आहे. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर उर्वरित पदे भरण्यात येतील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील खाजगी रुग्णालये कोविड-१९ च्या रुग्णांची आर्थिक फसवणूक करीत असल्याबाबत

(२) १३०९९ (१४-०९-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे सह संपूर्ण राज्यातील रुग्णालये करोना रुग्णांवर औषध नसतानाही पीपीई किट, मुखपट्टी, हातमोजे यांच्या खर्चाची विविध रुग्णांकडून ४-५ पट खर्च दाखवून ८० हजार ते ५ लाख पर्यंत उपचार शुल्क आकारून आर्थिक फसवणूक केल्या प्रकरणी आयुक्त महापालिका यांचेकडे अद्यापपर्यंत शेकडो तक्रारी दाखल करण्यात आल्याचा प्रकार दिनांक २ जुलै,२०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावतीहून ठाण्यातील निवासस्थानी परतलेल्या एका ७१ वर्षीय ज्येष्ठ नागरीकाने नौपाडा येथील खासगी लॅबमध्ये करोना चाचणी करुन रिपोर्ट पॉझिटीव्ह आल्याने उपचारासाठी ठाणे-घोडबंदर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असता सदरहू रुग्णालयामध्ये आठ दिवसाचे सुमारे एक लाख रुपये इतके अवास्तव बील आकारून रुग्णांची आर्थिक लूट केल्याचा प्रकार निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार माहे जुलै, २०२० अखेर पर्यंत विविध संस्थांकडे खाजगी रुग्णालयांनी फसवणूक केल्या प्रकरणी एकूण किती तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, त्यापैकी किती तक्रारींची चौकशी व कारवाई करुन रुग्णांच्या नातेवाईकांना जादा आकारलेले शुल्काची रक्कम परत केली आहे व अद्याप किती तक्रारींचे निवारण करणे बाकी आहे तसेच कोविड रुग्णांची आर्थिक फसवणूक करणारे व त्यांना परतावा रक्कम न देणाऱ्या खासगी रुग्णालयांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (२९-०६-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे,
नवी मुंबई मनपाकडे कोवीड-१९ उपचार खर्चाच्या अवास्तव देयकाबाबत दिनांक ३०/११/२०२१ पर्यंत १६८ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. तथापि कोवीड-१९ उपचारामध्ये प्रत्येक रुग्णालयाने शासनाने निश्चित केलेल्या दराने बिल आकारणी करणे आवश्यक आहे, या संदर्भातील शिस्तबध्द अंमलबजावणीसाठी प्रत्येक जिल्हा आणि मनपा स्तरावर लेखा परिक्षण समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती बिल आकारणी संदर्भातील तक्रारींचे वेळोवेळी निराकरण करते.
(२) ठाणे महापालिकेने जादा बील आकारणीची तपासणी करण्यासाठी एक कमिटी स्थापन केली असून सदर कमिटी जादा आकारणी केलेल्या प्रत्येक प्रकरणाची वसुली करत आहे.
(३) कोविड-१९ उपचारामध्ये प्रत्येक रुग्णालये शासनाने निश्चित केलेल्या दराने बिल आकारणी करणे आवश्यक आहे, या संदर्भातील शिस्तबध्द अंमलबजावणीसाठी प्रत्येक जिल्हा आणि मनपा स्तरावर लेखा परिक्षण समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती बिल आकारणी संदर्भातील तक्रारींची वेळोवेळी निराकरण करते.
(४) दिनांक ३०/११/२०२१ पर्यंत नवी मुंबई मनपा क्षेत्रातील विविध खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचार घेतलेल्या रुग्णांची १७१५ देयके प्राप्त झाली असून त्यांचे लेखा परिक्षण पूर्ण करण्यात आले आहे. ज्या रुग्णांकडून ज्यादा बील आकारणी केलेली आहे त्यांना वाढीव बिल रक्कम संबंधित रुग्णांस परत करणेबाबत नोटिसा देण्यात आल्या आहेत. अशाच स्वरुपाची कार्यवाही राज्यातील सर्व जिल्हा व मनपा कार्यक्षेत्रात करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोरोना संसर्गाच्या काळात काम करणाऱ्या वैद्यकीय शिक्षण विभागाच्या माजी संचालक यांच्यासह राज्यातील शेकडो डॉक्टरांना निवृत्ती वेतनापासून वंचित रहावे लागत असल्याबाबत

(३) ३२८३१ (०६-०१-२०२२). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना संसर्गाच्या काळात दिवस-रात्र काम करणाऱ्या वैद्यकीय शिक्षण विभागाचे माजी संचालक डॉ. तात्याराव लहाने यांच्यासह राज्यातील शेकडो डॉक्टरांना निवृत्ती वेतनापासून (पेन्शन) वंचित रहावे लागत असल्याची बाब दि. ७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैद्यकीय शिक्षण विभाग याबाबत वेगवेगळे शासन निर्णय काढत असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रोत्साहन म्हणून डॉक्टरांना जे ज्यादा वेतन दिले गेले त्याची वसुली त्यांच्या निवृत्तीच्या वेळी वा त्याआगोदर करण्याचे आदेश वैद्यकीय शिक्षण विभागाने काढले असून निवृत्तीवेतन हवे असल्यास अगोदर पगारवाढीचे पैसे जमा करा ही भूमिका वैद्यकीय शिक्षण विभागाने घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वैद्यकीय शिक्षण विभागातून निवृत्त झालेल्या डॉक्टरांना निवृत्तीवेतन सुरु करण्याबाबत मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी तातडीने बैठक घेऊन संचालकांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली असून या समितीला १५ दिवसांत अहवाल देण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू आदेशानुसार अहवाल सादर झाला असल्यास त्याचे स्वरुप काय आहे, त्यानुसार निवृत्त झालेल्या डॉक्टरांची कधीपासून निवृत्तीवेतन देण्यात येणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित देशमुख (०१-०८-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) यासंदर्भात सेवानिवृत्त अध्यापकांचे सेवापुस्तक पडताळणी करताना वेतन पडताळणी पथकाने आगाऊ वेतनवाढीबाबत उपस्थित केलेल्या आक्षेपासंदर्भात नियमानुसार कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) अध्यापकांना निवृत्तीवेतन मंजूरी संदर्भात येत असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ०९.०९.२०२१ अन्वये समिती गठीत करण्यात आली होती. समितीने सादर केलेल्या अहवालानुसार सेवानिवृत्त अध्यापकांना निवृत्तीवेतन मंजूरी संदर्भात वेतन पडताळणी पथकाने घेतलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक १९.०१.२०२२ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे आयुक्त (वै.शि.) वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई तसेच संचालक, लेखा व कोषागरे, महाराष्ट्र राज्य यांना कळविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय व अनुसंधान केंद्रात नवीन पदव्युत्तर आणि अति विशेषोपचार तसेच ६१५ खाटांचे रुग्णालय सुरु करण्याबाबत

(४) ३२८६१ (०७-०१-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय व अनुसंधान केंद्रात नवीन पदव्यूत्तर आणि अति विशेषोपचार तसेच ६१५ खाटांचे रुग्णालय सुरु करण्याबाबतच्या विचाराधीन प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे व यासाठी किती जादा कोटीची तरतूद करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित देशमुख (१७-०६-२०२२) : (१) व (२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय व अनुसंधान केंद्र, नागपूर या संस्थेच्या श्रेणीवर्धनासाठी एकूण ११६५.६५ कोटी किंमतीच्या प्रस्तावास दिनांक १३.१०.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

चंद्रपूर येथील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात पाचशे कंत्राटी कामगारांना त्यांचे थकीत पगार देण्याबाबत

(५) ३३७८२ (०६-०१-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील ५०० कामगारांना गेल्या ८ महिन्यांपासून वेतन मिळालेले कागदपत्रे नसल्याने त्यांच्या कुटूंबियांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे दिनांक ६ मार्च,२०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटी सेवा पुरविण्याच्या कामाचे कंत्राट दिनांक ५ मार्च, २०२० रोजी शासनाने रद्द केल्यानंतर निविदा प्रक्रियेतील इतर कंत्राटदारांना काम घेण्याबाबत चर्चेसाठी बोलवल्याचे किंवा नवीन निविदि प्रक्रिया तातडीने राबविण्याची कार्यवाही करणे आवश्यक असतांना अधिष्ठाता कार्यालयाने जाणीवपूर्वक दिरंगाई करुन सर्व कंत्राटी कामगारांना रोजंदारीवर कार्यालात ठेवल्याने कंत्राटी कामगारांचे वेतन देण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कंत्राटी कामगारांच्या खात्यावर थेट वेतन जमा करण्याचे लेखी निर्देश जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी सदर कार्यालयास देवूनही त्याची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन अदा करण्याच्या अनुषंगाने माहे,ऑगस्ट, २०२१ मध्ये सादर करण्यात आलेल्या देयकामध्ये कोषागर कार्यालयाने उपस्थित केलेल्या आक्षेपांची पूर्तता करण्याची कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या कामगारांचे थकीत वेतन व दोन वर्षापूर्वी शासनाने मंजूर केलेले किमान वेतन लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित देशमुख (०१-०७-२०२२) : (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) व (३) नाही.
(४) व (५) कंत्राटी कर्मचाऱ्यांचे प्रलंबीत वेतन अदा करण्यासाठी दि. ३१.०३.२०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.तसेच आवश्यक निधी संस्थेला वितरीत केलेला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (मेडिकल), नागपूर येथे अधिष्ठाता पदावर नियमबाहयरित्या नेमणूक केल्याबाबत

(६) ३३९९८ (०६-०१-२०२२). श्री. मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (मेडिकल), नागपूर हे मध्य भारतातील सर्वात मोठे रुग्णालय असून येथे अधिष्ठाता या पदाचा पुरेसा अनुभव नसतांना व पदोन्नतीच्या यादीतील अनेक डॉक्टर असतांना देखील अनुभव नसलेल्या डॉक्टरांना अधिष्ठाता पदावर पदोन्नती देण्यात आली असल्याची बाब माहे मे,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुरेसा अनुभव नसतांना व प्रतीक्षा यादीतील अनेक पात्र डॉक्टर असतांना देखिल नियमबाह्य पदोन्नती देण्याचे कारणे काय आहेत,
(३) असल्यास, नियमबाहयरित्या पदोन्नती देण्याऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह नियमबाह्यरित्या झालेली नियुक्ती रद्द करून प्रतीक्षा यादीतील पात्र उमेदवाराला नियुक्ती देण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित देशमुख (२३-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) लागू नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे रोबोटिक शस्त्रक्रिया विभागाला यांत्रिक रोबोटची खरेदी प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

(७) ३४३२२ (०७-०१-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे रोबोटिक शस्त्रक्रिया विभागाला दोन ते अडीच वर्षापासून यांत्रिक रोबोट खरेदी प्रक्रिया प्रलंबित असल्याचे दिनांक ४ ऑक्टोंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य खनिकर्म महामंडाळाकडून १६ कोटी ८० लाख रूपयांचा निधी हाफकिन संस्थेच्या खात्यात जमा करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर यंत्राची खरेदी प्रक्रिया त्वरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित देशमुख (३०-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) हाफकीन महामंडळाकडून एकूण ३ वेळा निविदा प्रक्रिया प्रसिद्ध करुनही निविदेच्या अटी व शर्तीची पुर्तता होत नसल्याने, पुर्ननिविदा सुचना प्रसिद्ध करण्यात आलेली असून सदर यंत्र खरेदीची कार्यवाही हाफकीन महामंडळाकडून सुरु आहे.

अंबाजोगाई (जि. बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील समस्याबाबत

(८) ३४८४६ (०६-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि. बीड) येथे स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात ५१८ खाटांची क्षमता मंजूर आहे परंतु या रुग्णालयामध्ये रुग्ण संख्या ही ८०० ते १००० च्या आसपास असते, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, यामुळे रुग्णांना उपचारासाठी खाटा उपलब्ध होत नसल्याने त्याना योग्य असे उपचार मिळत नसल्यामुळे सदरील रुग्णालयाला एक हजार खाटा मंजूर करुन डॉक्टर, कर्मचारीवर्ग, नर्सेस आणि इतर पदे मंजूर करुन मान्यता देण्यात यावी अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित देशमुख (०१-०७-२०२२) : (१) होय.

(२) सदर रुग्णालयात मंजूर क्षमतेपेक्षा जास्त रुग्ण दाखल होत असतात.

(३) सदर रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन खाटांची संख्या व पदनिर्मितीबाबत लोक प्रतिनिधीकडून मागणी होत असते.

(४) यासंदर्भात आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांनी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांनुसार प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश संस्थेला दिले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

गोरेगाव (पूर्व) मुंबई येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या विकासाबाबत

(९) ३५४०२ (१०-०१-२०२२). श्री. रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) गोरेगाव (पूर्व), मुंबई येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या परिसरात सिनेनिर्मिती उद्योगासाठी पायाभूत सुविधा निर्माण करून शासनाचा महसूल वाढविण्याच्या दृष्टीकोनातून युनिव्हर्सल स्टुडिओ किंवा हैद्राबादच्या रामोजी चित्रनगरीप्रमाणे विकास करण्यासंदर्भातील बृहत आराखड्यास पायाभूत समितीने माहे नोव्हेंबर,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान मान्यता दिली असून आजमितीस तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटूनही या प्रकल्पास अद्याप सुरूवात झालेली नाही, हे खरे आहे काय, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाच्या अनुषंगाने आजवर काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेस कोणताच प्रतिसाद मिळत नसल्याप्रकरणी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, या परिसरात अनधिकृत झोपडयांचे वाढते प्रमाण लक्षात घेता त्यास आळा घालण्याच्या अनुषंगाने अनधिकृत झोपडयांचे निष्कासन व पात्र झोपडयांचे सर्व्हेक्षण करुन त्यांचे पूनर्वसन विकासकामार्फत करुन उर्वरीत जागेत संरक्षक भिंत बांधून जागा संरक्षित करणे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या परिसरातील पात्र झोपडयांचे सर्व्हेक्षण, पुनर्वसन तसेच अनधिकृत झोपडयांचे निष्कासन आणि संरक्षण भिंतीचे काम किती कालावधीत करण्यात येणार आहे,

(५) तसेच, या चित्रनगरीचा विकास हा राज्याच्या महसुलाशी निगडीत असून त्यानुषंगाने या प्रकरणी तातडीने कार्यवाही करून या कामास गती देणे आवश्यक असल्याने सदरहू प्रकल्पाच्या निविदा प्रक्रिया नव्याने राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अमित देशमुख (०१-०७-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, दिनांक २८.११.२०१७ रोजी प्रकल्पास पायाभूत समितीने मंजूरी दिल्यानंतर दिनांक १२.०७.२०१८ पासून निविदा ई-संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. निविदा भरण्याची अंतिम तारीख दिनांक १४.०४.२०१९ होती. तथापि, एकाही निविदाकाराने प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे प्रकल्प संनियंत्रण समितीच्या मान्यतेने निविदेमध्ये बदल करुन पुनश्च: दिनांक १४.०८.२०१९ ते २१.०२.२०२० या कालावधीमध्ये निविदा ई-संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. संचालक मंडळाने दिनांक २२.१०.२०२० च्या ठराव क्र.१५४/११ अन्वये बृहत आराखडा संदर्भात २ वेळा निविदा प्रक्रिया राबवूनही प्रतिसाद न मिळण्याची कारणमिमांसा तपासण्याबाबत निर्देश दिले. तसेच दिनांक ११.०१.२०२१ रोजी मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. सदर बैठकीमध्ये चित्रनगरीचा टप्प्याटप्प्याने विकास करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

(३) होय, चित्रनगरीमधील पात्र झोपडपट्टयांचे पुनर्वसन करुन अपात्र झोपडपट्टयांचे निष्कासन करणे प्रस्तावित आहे. झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनाची जबाबदारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची आहे. महामंडळामार्फत प्राधिकरणाकडे त्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. दिनांक १४.१०.२०२० रोजी व्यवस्थापकीय संचालक, दादासाहेब फाळके चित्रनगरी व मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांची बैठक झाली. सदर बैठकीत झोपडपट्टीवासियांचे शासन निर्णयानुसार पात्रता निश्चित करण्याबाबत निर्णय झाला. दिनांक २९.१.२०२१ रोजी महामंडळाचे अधिकारी, प्राधिकरणाचे अधिकारी व झोपडपट्टीवासियांचे प्रतिनिधी यांची एकत्रित बैठक घेण्यात आली.

(४) व (५) कालबध्द कार्यवाही चालू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

आदिवासीमधील सिकल सेल आजाराचे वाढते प्रमाण संपुष्टात आणण्याबाबत

(१०) ३५७०७ (१०-०१-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिकलसेल या आजाराचे सर्वाधिक प्रमाण आदिवासीं भागात आढळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासींना सिकलसेल आजार होण्याचे प्रमाण महाराष्ट्रात सर्वाधिक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिकल सेल आजाराच्या निर्मूलनासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत?

श्री. राजेश टोपे (२९-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) हे अशंत: खरे आहे,

मध्य व दक्षिण भारतातील प्रामुख्याने मध्यप्रदेश, महाराष्ट्र, तामिळनाडू, गुजरात, आंध्रप्रदेश, केरळ, कर्नाटक, ओरिसा, प.बंगाल, छत्तीसगड इ. या राज्यांतील आदिवासीना सिकलसेल आजार होण्याचे प्रमाण तुलनेने जास्त आहे.

(३) सिकल सेल आजाराच्या निर्मूलनासाठी शासनामार्फत करण्यात आलेल्या उपाययोजना-

• सिकलसेल रुग्णांस गरजेनुसार फोलीक ॲसीड, ॲन्टीबायोटीक्स (प्रतिजैविके), हॅड्रोक्सीयुरीया तसेच पेनकिलर्स सर्व आरोग्य केंद्रावर मोफत उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

• आवश्यकतेनुसार रुग्णांस रक्त संक्रमणाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

• सिकलसेल आजाराचे निदान, उपचार, प्रतिबंध, समुपदेशन व जनजागृती करण्यात येते. तसेच दरवर्षी ११ ते १७ डिसेंबर दरम्यान सिकलसेल सप्ताह व दिनांक १९ जून जागतिक सिकलसेल दिन साजरा करण्यात येतो.

• सिकलसेल आजाराचे निदान करण्यासाठी सोल्युबिलीटी / इलेक्ट्रीफोरेसिस व एचपीएलसी मार्फत रुग्णांच्या रक्ताची तपासणी करून अंतिम निदान करण्यात येते.

• आवश्यकतेनुसार सिकलसेलचे रुग्ण / वाहक असणाऱ्या गरोदर मातांना प्रसुतीपूर्व निदान करण्यास तसेच आवश्यकता असल्यास वैद्यकीय गर्भपाताबाबत समुपदेशन केले जाते.

• बृन्हमुंबई महानगर पालिकेच्या अंतर्गत असणाऱ्या BMT सेंटर बोरीवली मुंबई येथे सिकलसेल संबधी प्रसुतीपूर्व निदान करण्यासाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

• डागा स्त्री रुग्णालय, नागपूर येथे सिकलसेल बाबत प्रसुतीपूर्व निदान करण्यासाठी सेंटर सुरू करण्याची कार्यवाही चालू आहे.

विविध प्राथमिक आरोग्य केंद्रात तदर्थ अंतर्गत वैद्यकीय अधिकारी बी.ए.एम.एस. यांना पुर्ननियुक्ती कायम स्वरुपी करणेबाबत

(११) ३५७३५ (१०-०१-२०२२). श्री.शेखर निकम (चिपळूण) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन आदेशान्वये सन २०१७ व २०१९ मध्ये आरोग्य सेवेच्या पदभरतीत एम.बी.बी.एस.वैद्यकीय अधिकारी वर्गाला प्रथम प्राधान्य देण्यात आले असून सदर अर्हतेचा उमेदवार उपलब्ध न झाल्याने शासनाने तदर्थ वैद्यकीय अधिकारी म्हणून बी.ए.एम.एस. डॉक्टरांना प्राधान्य देऊन प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पदस्थापना केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध प्राथमिक आरोग्य केंद्रात तदर्थ अंतर्गत बी.ए.एम.एस. डॉक्टर गेल्या दोन वर्षापासून पूर्ण वेळ कार्यरत असून कोविड-१९ या आजाराच्या प्रादुर्भावात चांगल्या प्रकारे वैद्यकीय सेवा केली आहे तसेच कोरोना रुग्णास गृहभेट, CCC, DCHC, ISOLATION CENTRE येथे पर्यायी वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करत असून कोरोना प्रादुर्भावामध्ये उत्तमप्रकारे काम करुन विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्ती देताना करण्यात आलेल्या करारपत्रातील नियमानुसार त्या त्या संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या बी.ए.एम.एस. डॉक्टरांच्या ठिकाणी एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी रुजू झाल्यास बी.ए.एम.एस डॉक्टरांना कार्यमुक्त केले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, एम.बी.बी.एस. अर्हताधारक उमेदवारास ग्रामीण रुग्णालय त्याचबरोबर जिल्हा रुग्णालय या ठिकाणी रिक्त असलेल्या जागी प्राधान्य देण्यात यावे, त्याचबरोबर सदर तदर्थ बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांची प्राथमिक आरोग्य केंद्रातील नियुक्ती ही कंत्राटी स्वरुपाची असल्याने त्यांना पुनर्नियुक्ती कायम स्वरुपी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१६-०६-२०२२) : (१), (२) व (३) होय.
(४) शासन परिपत्रक दि.०४.०७.२०१९ नुसार वैद्यकीय अधिकारी गट-अ या संवर्गातील रिक्त पदे नियमित एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी मिळेपर्यंत कंत्राटी पध्दतीने एम.बी.बी.एस. अर्हताधारकांमधून प्राधान्याने भरणेबाबत निर्देशित केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

चंद्रपूर जिल्ह्यात कॅन्सर रुग्णालय सुरु करण्याबाबत

(१२) ३५९२७ (१०-०१-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात १०० खाटांचे कॅन्सर रुग्णालय सुरु करण्याचा निर्णय तत्कालीन शासनाने घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने कॅन्सर हॉस्पिटलचे काम पूर्ण झाले आहे काय,
(३) नसल्यास, प्रत्यक्षात कॅन्सर हॉस्पिटल सुरु होण्यासाठी अजून किती कालावधी अपेक्षित आहे ?

श्री. अमित देशमुख (१७-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) चंद्रपूर येथील कर्करोग रुग्णालयाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.
(३) चंद्रपूर येथील कर्करोग रुग्णालयाचे बांधकाम माहे ऑक्टोबर, २०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

मराठी चित्रपटांना अनुदान मिळण्याबाबत

(१३) ३६०२३ (१०-०१-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.बबनराव शिंदे (माढा) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मराठी चित्रपटांना प्रोत्साहन मिळून चित्रपट सृष्टीचा अधिकाधिक विकास व्हावा या उद्देशाने शासनामार्फत दरवर्षी शासकीय अनुदान दिले जाते तथापि मागील चार वर्षात अनुदानासाठी पाठविण्यात आलेल्या ३०० हून अधिक चित्रपटांचे परीक्षणच (स्क्रीनिंग) झाले नसल्याचे अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे पदाधिकारी शिष्टमंडळाने निदर्शनास आणले असल्याचे दिनांक २७ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चित्रपटांचे परीक्षण करण्यासाठी अद्याप अनुदान समिती देखील नेमली नसल्यामुळे सदर समिती तात्काळ नेमण्यात यावी अशी मागणी अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाकडून शासनास करण्यात आली असल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चित्रपटांचे परीक्षण करण्यासाठी समिती नेमण्याबाबत तसेच चित्रपटांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित देशमुख (०१-०७-२०२२) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.
कोरोना प्रादुर्भावामुळे महामंडळाकडे मागील २ वर्षात अंदाजे २६५ चित्रपटांचे परीक्षण (स्क्रीनिंग) करिताचे प्रस्ताव शिल्लक आहेत.
(२) व (३) शासन निर्णय दि.२३.९.२०२१ अन्वये मराठी चित्रपटांना अर्थसहाय्य मंजूर करण्यासाठी चित्रपट परीक्षण समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे. सद्यस्थितीत चित्रपटांचे परीक्षण सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्हयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना काम थांबविण्याचे आदेश मिळाल्याबाबत

(१४) ३६१८७ (१०-०१-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयात कोरोना संसर्गाच्या काळात आरोग्य सेवा देण्याऱ्या ८३ सदर्थ वैद्यकीय अधिकाऱ्यांना काम थांबविण्याचे आदेश आरोग्य विभागाकडून देण्यात आल्याचे माहे सप्टेंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू वैद्यकीय अधिकारी गेले तीन महिन्यांपासून विना वेतन काम करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासदंर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तदनुसार याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१६-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांचे वेतनाकरीता लागणारे अनुदान प्राप्त झालेले नसल्याने वेतन अदा करण्यात आलेले नव्हते. तथापि, अनुदान प्राप्त होताच तात्काळ तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांना वेतन अदा करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जि.यवतमाळ) येथे एक्स-रे मशीन बंद असून स्वच्छतेचा ही अभाव असल्याबाबत

(१५) ३६२२५ (०६-०१-२०२२). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जि.यवतमाळ)येथील अस्थिव्यंगोपचार, मेडीसीन यासह इतरही विभागातील रुग्णांसाठी एक्स-रेद्वारे आजाराचे निदान केले जात असून सदर रुग्णालयातील एक्स-रे मशीन बंद असल्याने रुग्णांना एक्सरे न काढताच परत जावे लागत आसल्याचे निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयातील एक्स-रे मशीन बंद असणे तसेच देखभाल दुरुस्ती व प्लेसची खरेदी नियमित होत नसल्याने सर्वसामान्य रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णालयात व परीसरात अस्वच्छता असून तेथे निरीक्षक कार्यरत असतांना देखिल त्यांचे कोणावरही नियंत्रण नसणे व स्वच्छतेबाबत निरीक्षक रुग्णालयास नोटीसही बजावली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, सदर रुग्णालयात उद्भवणाऱ्या समस्याचे निराकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित देशमुख (१७-०६-२०२२) :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथील रोजंदारी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत

(१६) ३६३८१ (०७-०१-२०२२). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथील रोजंदारी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत.लोकप्रतिनिधींनी मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री यांना दिनांक १४ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र देऊन विनंती केली आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सदर विनंती पत्राच्या अनुषंगाने शासनाने उक्त रुग्णालयातील रोजंदारी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित देशमुख (०१-०७-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) सदर संस्थेतील १११ रोजंदारी मजूरांनी वर्ग-४ पदावर नियमित करण्याबाबत औद्योगिक न्यायालय, सोलापूर येथे याचिका दाखल केलेल्या आहेत. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात मलेरीया, डेंग्यू आणि चिकण गुणीया यासारख्या गंभीर आजारांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात सुरु असल्याबाबत

(१७) ३७७५६ (२४-०४-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मलेरीया, डेंग्यू आणि चिकण गुणीया यासारख्या गंभीर आजारांचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईत सन २०२० तुलनेत डिसेंबर २०२१ पर्यंत पावसाळी आजारांचे प्रमाण १८ टक्क्याने वाढले असून या वर्षात मलेरीयाचे १३३, डेंग्युचे ७४४, गॅस्ट्रोचे ४७७, कावीळचे ३८, चिकनगुनियाचे ७८, एच१एन१ चे २० रुग्ण अश्या प्रमाणात रुग्णसंख्या वाढली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली जिल्हयात ८६ टक्के डेंगू, मेलेरिया रूग्णाची वाढ झाली असून जवळपास ३५९५ डेग्यू, तर १०६९७ मलेरियाचे रूग्ण आढळून आल्याचे दि. २९ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात साथ आजारांच्या निर्मुलनार्थ किंवा त्यांचा वाढता प्रादूर्भाव रोखण्यासाठी शासनाने केलेल्या उपाययोजनांचे स्वरुप काय आहे ?

श्री. राजेश टोपे (२८-०६-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

डेंग्यू रुग्ण संख्येमध्ये सर्वच जिल्ह्यांमध्ये वाढ दिसून येत आहे तर चिकणगुणीया हा पुणे, कोल्हापूर, नाशिक, अकोला, सातारा, ठाणे आणि पालघर या जिल्ह्यांमध्ये वाढ दिसून येत आहे तर हिवताप रुग्णसंख्येत गोंदिया, गडचिरोली व नागपूरमध्ये वाढ दिसून येत आहे.

(२) हे अंशत: खरे आहे .

• राज्यामध्ये मुंबई भागामध्ये माहे डिसेंबर २०२१ मध्ये कीटकजन्य रुग्णांची माहिती खालीलप्रमाणे -

	हिवताप		डेंग्यू		चिकणगुनीया	
	लागण	मृत	लागण	मृत	लागण	मृत
२०२०	३५९	०	१२९	३	०	०
२०२१	२८८	०	८७३	३	७८	०

• राज्यामध्ये मुंबई भागामध्ये जलजन्य आजारांची माहे डिसेंबर २०२१ मध्ये रुग्णांची माहिती खालीलप्रमाणे-

	कावीळ		गॅस्ट्रो		स्वाईन फ्लू (एच १ एन १)	
	लागण	मृत	लागण	मृत	लागण	मृत
२०२०	०	०	०	०	५०	०
२०२१	०	०	०	०	७४	०

• राज्यामध्ये जलजन्य आजारांची माहे डिसेंबर २०२१ मध्ये रुग्णांची माहिती खालीलप्रमाणे -

	कावीळ		गॅस्ट्रो		स्वाईन फ्लू (एच १ एन १)	
	लागण	मृत	लागण	मृत	लागण	मृत
२०२०	७	०	१०४	०	१२१	३
२०२१	१०	०	४४४	०	२८९	२

मुंबई मध्ये स्वाईन फ्ल्यू (एच १ एन १) च्या रुग्णांमध्ये वाढ दिसून येत आहे.

(३) होय, हे खरे आहे.

• पूर्व विदर्भातील वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, नागपूर व गोंदिया जिल्ह्यात रुग्णसंख्येत वाढ दिसून येत आहे तर डेंग्यू रुग्ण संख्येमध्ये गोंदिया, गडचिरोली व नागपूरमध्ये वाढ दिसून येत आहेत. तर डेंग्यू रुग्ण संख्येमध्ये सर्वच जिल्ह्यांमध्ये वाढ दिसून येत आहे.

• हिवताप रुग्णांची वाढ ही गोंदिया, गडचिरोली व नागपूरमध्ये दिसून येत आहे.

(४) डेंग्यू, मलेरिया हा आजार डासापासून होतो. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात डासाच्या प्रतिबंधासाठी खालील उपाययोजना केलेल्या आहेत.

• आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत नियमित ताप सर्वेक्षण.

• साथरोग उद्रेकाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी जिल्हा पातळीवर शीघ्र प्रतिसाद पथके कार्यरत.

• उद्रेकाच्या ठिकाणी जलद ताप रुग्ण सर्वेक्षण.

• हिवताप समस्याग्रस्त गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील एकूण ११७१ गावातील ४,६९,६०३ लोकसंख्येमध्ये किटकनाशकाची फवारणी करण्यात आलेली आहे.

• नागपूर विभागामध्ये हिवतापाचा प्रादुर्भाव कमी करणेसाठी २,३८,२०० मच्छरदाण्याचे (LLIN) वाटप करण्यात आले.

• १५ हिवताप समस्याग्रस्त प्रा.आ.केंद्रामध्ये येथे हिवताप रुग्ण शोध मोहिमेद्वारे २,३६,०७६ लोकांचे रक्तनमुने संकलन करून त्यामध्ये १६४ हिवताप दूषित रुग्ण आढळून आलेल्या सर्व रुग्णांना समूळ उपचार देणेत आलेला आहे.
• राज्यात डेंग्यू विषाणूजन्य तापाच्या निदानासाठी ४२ सेंटीनल सेंटर्सची स्थापना केली असून राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था, पुणे येथेही निदानाची व्यवस्था आहे.
• राज्यात गप्पीमासे पैदास केंद्र कार्यरत असून राज्यातील डासोत्पत्ती स्थानांमध्ये गप्पीमासे सोडणे.
• नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण.
• उद्रेकग्रस्त ठिकाणी किटकनाशकाची धुरफवारणी.
• शासकिय तसेच खाजगी वैद्यकिय व्यावसायिकांचे डेंग्यू, मलेरिया रुग्ण व्यवस्थापन विषयक कार्यशाळेचे आयोजन.
• डेंग्यू, मलेरिया रुग्णांना लक्षणाधारीत उपचार.
• सर्व आरोग्य संस्थांना औषधे व इतर साधन सामुग्रीचा पुरेसा पुरवठा.
• शालेय डेंग्यू जागृती मोहिम.
• उद्रेकग्रस्त ठिकाणी उपाययोजनांच्या मार्गदर्शनासाठी जिल्हा/ विभागीय / राज्यस्तरीय अधिकाऱ्यांच्या भेटी.
• विविध माध्यमांद्वारे जनतेस आरोग्य शिक्षण.
• स्वाइन फ्ल्यू प्रतिबंधासाठी अतिजोखमीच्या व्यक्तींना ऐच्छिक व मोफत लसीकरण.
• पाणी गुणवत्ता नियंत्रण.
• साथरोग व प्रतिबंधासाठी व नियंत्रणासाठी राज्यस्तरीय तांत्रिक समितीची स्थापना.
• निदानासाठी प्रयोगशाळा सुविधा.

नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय कर्मचाऱ्याच्या वेतनासाठी जादा रक्कम अदा केल्याबाबत

(१८) ३७८९४ (१३-०४-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास (मेयो) सन २०२१-२२ या वर्षाकरीता कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी ३.५ कोटी रुपयांऐवजी शासनाकडून ३५.६३ कोटी रुपये देण्यात आले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर चूक रुग्णालय प्रशासनास लक्षात आल्यावर त्यांनी ही चूक लिपिकाकडून झाली असल्याची दावा करीत अतिरिक्त रक्कम परत घेण्याची विनंती शासनाला केली असून शासनाच्या परिपत्रकानुसार मेयोने रु.३५,६३,४०००० पैकी रु. १०,४३,२३००० उपयोगात आणले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रूग्णालय प्रशासनाने शिल्लक असलेल्या रू. २२.०० कोटीच्या निधी खर्च करण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, नियमानुसार शासनाने एखाद्या संस्थेसाठी कोणताही निधी मंजूर करतांना परिपत्रक काढणे आवश्यक आहे मात्र या प्रकरणात शासनाने एका आर्थिक वर्षासाठी एवढा मोठा निधी कसा जारी करताना शासन निर्णय काढला आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय ,
(६) असल्यास, त्यानुसार लेखा व वित्त विभागातील दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित देशमुख (०१-०७-२०२२) : (१) होय.
(२) नाही.
(३) नाही.

शासन निर्णय दि. २१.०१.२०२२ अन्वये रू. ३५.६३ कोटी पैकी रु.१०.४३ कोटी इतका निधी पुनर्विनियोजनाने अन्य ०५ संस्थांना वळती करून देण्यात आला आहे. उर्वरित रू. २५.२० कोटी ही रक्कम सन २०२१-२२ च्या सुधारीत अंदाजामध्ये रू. ६.२० कोटी करण्यात आली आहे.
(४) वित्त विभागाने श्वेतपुस्तिका दि. ०५.०७.२०२१ मध्ये अनुदानाचा तपशिल प्रसिध्द करण्यात आलेला आहे.
(५) दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरूध्द दि. २१.०१.२०२२ रोजी ज्ञापनान्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. नियमानुसार कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे अटाळी (ता.खामगाव, जि.बुलढाणा) येथील श्री विठ्ठल रूख्मिणी श्री संत भोजने महाराज संस्थान या तीर्थक्षेत्र विकास योजनेतील मंजूर कामांना कार्यारंभ आदेश व निधी उपलब्ध करून देणेबाबत

(१९) ३७९८८ (२९-०३-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे अटाळी (ता.खामगाव, जि.बुलढाणा) येथील श्री विठ्ठल रूख्मिणी श्री संत भोजने महाराज संस्थान या प्रसिध्द ब-वर्ग तीर्थक्षेत्र विकास योजनेतील मंजूर विविध कामांना शासन निर्णय क्रमांक तीर्थवि२०१८/प्र.क्र./३०५/ योजना-६, दिनांक ६ मार्च, २०१९ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्यानुषंगाने निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रक्रिया होवूनही अद्यापपर्यंत सदर कामांना शासनाकडून कार्यारंभ आदेश व निधी अप्राप्त आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी उपसचिव, ग्रामविकास विभाग यांना माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान पत्रान्वये कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू कामांना कार्यारंभ आदेश व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (२१-०६-२०२२) :१) अंशत: खरे आहे.
(२),(३) व (४) जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्याकडील पत्राच्या अनुषंगाने प्रस्तुत कामांना शासनाच्या दिनांक १७/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मुदतवाढ दिली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

वैद्यकीय संचालकाचे पद भरणेबाबत

(२०) ३८००० (२४-०४-२०२२). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोनाची तिसरी लाट आली असतांना गत ३५ महिन्यांपासून कायम वैद्यकीय संचालकाचे पद रिक्त असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैद्यकीय शिक्षण विभागातील कायम वैद्यकीय संचालकाचे महत्वाचे पद तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित देशमुख (०१-०७-२०२२) : (१) व (२) हे खरे आहे.
विभागाच्या अधिपत्याखालील संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अस्थापनेवर संचालक

(वैद्यकीय) या संवर्गाचे १ पद मंजूर आहे. सदर पदावरील अधिकारी दिनांक ३१.०१.२०१९ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे सदरचे पद रिक्त झाले आहे. सद्यस्थितीत, संचालक (वैद्यकीय) या पदाचे सेवाप्रवेश नियम सुधारीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे जिल्ह्यातील आशा स्वयंसेविका व गट प्रवर्तक यांचे नियमित मानधन व वाढीव मानधन वेळेवर मिळत नसल्याबाबत

(२१) ३८००२ (२४-०४-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्ह्यातील आशा स्वयंसेविका व गट प्रवर्तक यांचे नियमित मानधन व वाढीव मानधन वेळेवर मिळत नसल्याने आशा स्वयंसेविका व गट प्रवर्तक यांनी थकीत मानधनासाठी काम बंद आंदोलन करण्याचा इशारा दिनांक ०३ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आशा स्वयंसेविका व गट प्रवर्तकांना थकीत मानधन व वाढीव मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१५-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात धुळे जिल्हयातील आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांना केंद्र शासनाच्या पीआयपी नुसार रु. ९१९.२९ लक्ष इतका मोबदला अदा करावयाचा होता. त्यापैकी माहे मार्च २०२२ अखेर पर्यंत रु. ८७७.६६ लक्ष इतका मोबदला अदा करण्यात आलेला आहे. उर्वरित रु. ४१.६३ लक्ष इतका मोबदला अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. राज्य शासनातर्फे रु. ५८५.२२ लक्ष इतका मोबदला अदा करावयाचा होता. त्यापैकी माहे मार्च, २०२२ पर्यंत रु. १८१.४१ लक्ष इतका मोबदला अदा करण्यात आलेला आहे. उर्वरित रु. ४०३.८१ लक्ष इतका मोबदला अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. केंद्र शासनाचा कोविडचा रु. १७६.९४ लक्ष इतका मोबदला अदा करावयाचा होता. त्यापैकी माहे मार्च, २०२२ अखेर रु. ७२.३ लक्ष इतका मोबदला अदा करण्यात आलेला असून उर्वरित रु. १०४.६४ लक्ष इतका मोबदला अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

रत्नागिरी जिल्हयातील कामथे (ता. चिपळूण) येथील ट्रामा केअर सेंटरमधील रिक्त पदे भरण्यासंदर्भात

(२२) ३८०१७ (२४-०४-२०२२). श्री. भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कामथे (ता. चिपळूण,जि.रत्नागिरी) येथील ट्रामा केअर सेंटरमधील रिक्त पदे भरण्यासंदर्भात वैदयकीय अधिकारी गट-अ संवर्गातील रिक्त पदांवर शासन निर्णय दिनांक ३/१२/२०१८ अन्वये मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली गठीत समितीद्वारे प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे ११ महिन्याच्या कालावधीकरिता कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर नेमणूका करण्यात येत असून गट-क संवर्गातील पदोन्नतीची रिक्त पदे भरणेबाबत उपसंचालक,आरोग्य सेवा कोल्हापूर यांचे स्तरावर कार्यवाही सुरू आहे व सरळसेवेची रिक्त पदे भरणेबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे, असे आश्वासन मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांनी दिनांक २ डिसेंबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिलेल्या उक्त आश्वासनानुसार कार्यवाही पूर्ण होवून कामथे येथील ट्रामा केअर सेंटरमधील कोणकोणती रिक्त पदे भरण्यात आली आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१६-०६-२०२२) : (१) वैद्यकीय अधिकारी गट अ (एस २०) ची रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत शा.नि.दि.०२.०३.२०१५, दिनांक २१.०४.२०१५ व दिनांक ०३.१२.२०१८ नुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीस अधिकार देण्यात आलेले आहेत. तसेच शा. नि. दि.०४.०७.२०१९ अन्वये वैद्यकीय अधिकारी गट-अ या पदावर एम.बी.बी.एस. अर्हताधारक उमेदवार उपलब्ध होईपर्यंन्त बी.ए.एम.एस. अर्हताधारक उमेदवारांना कंत्राटी पध्दतीने नेमण्याबाबत मान्यता दिलेली आहे. गट "क" व "ड" संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.
(२) कामथे येथील ट्रॉमा केअर सेंटरमध्ये वैद्यकीय अधिकारी यांची एकूण ५ पदे मंजूर असून त्यापैकी ४ पदे भरलेली व १ पद रिक्त आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

खामगाव (जिल्हा बुलढाणा) येथील सामान्य रुग्णालयात सोयी सुविधा पुरविण्याबाबत

(२३) ३८१३८ (२४-०४-२०२२). ॲड. आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव (जिल्हा बुलढाणा) येथील सामान्य रुग्णालयात रुग्णांना सुविधा पुरवण्यासाठी आवश्यक साहित्य उपकरणे व इतर बाबी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी, खामगाव यांनी त्यांच्या पत्र क्रमांक जा.क्र/विसस/ए४/२०२१/१४७ अन्वये मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांना दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर पत्रातील मागण्यांची पूर्तता करण्यास संदर्भात मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांनी त्यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. मंत्री/सा.आ.व कु.क/व्हीआयपी/२१२०/२०२१ दिनांक २५/८/२०२१रोजीअन्वये अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना सूचना वजा आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सामान्य रुग्णालय खामगाव येथे २०० खाटांच्या रुग्णालयाचे श्रेणी वर्धन करून ३०० खाटांचे करणेकरिता उपसंचालक आरोग्य सेवा, अकोला यांचे पत्र क्रमांक नियोजन/ बृहत आराखडा/ सारू खामगाव/ ९०४०-४२ दिनांक ६/३/२०१८ नुसार सहसंचालक, आरोग्य सेवा रुग्णालय राज्यस्तर मुंबई यांच्याकडे तसेच एसएनसीयु कक्ष १३ खाटांचे श्रेणी वर्धन करून २२ खाटांचे करणेबाबत प्रस्ताव सामान्य रुग्णालय खामगाव यांनी त्यांचे पत्र क्रमांक सा.रु.खा/एन एच एम/ एस एन सी यु/ बांध/१०९३८-४१ दिनांक २९/१२/२०१७ नुसार अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा कुटुंबकल्याणमाताबालसंगोपनवशालेयआरोग्यपुणेयांच्याकडे सादर केला आहे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रुग्णालयात नवीन शवविच्छेदन गृहाचे बांधकाम करणे बाबतचा प्रस्ताव सहसंचालक, आरोग्य सेवा राज्यस्तर रुग्णालय मुंबई यांच्याकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, RTPCR LAB खामगाव येथे कंत्राटी मनुष्यबळ उपलब्ध करून देणेबाबत वैद्यकीय अधीक्षक, सामान्य रुग्णालय, खामगाव व स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी जिल्हा शल्यचिकित्सक, बुलढाणा यांना मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, रुग्णांना योग्य निदान व योग्य उपचार तात्काळ देण्यासाठी सामान्य रुग्णालय, खामगाव येथे मागणीनुसार उपकरणे व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (२६-०५-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
सन २०११ जनगणनेवर आधारीत नवीन आरोग्य संस्था स्थापना व श्रेणीवर्धन करण्यासाठी आरोग्य संस्थांचा जोड-बृहत आराखडा तयार करण्यात येत असून त्यानुसार सदर संस्था निकषात बसत असल्यास जोड-बृहत आराखड्यामध्ये प्रस्तावित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) हे खरे नाही. सदर बाबत सुधारित प्रस्ताव जिल्हा शल्य चिकित्सक बुलढाणा यांच्याकडून मागविण्यात आला आहे. प्रश्न उद्भवत नाही.
(५) हे खरे आहे.
जिल्हा शल्यचिकित्सक यांचे स्तरावरुन कंत्राटी प्रयोगशाळा तंत्रज्ञ व मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले आहे.
(६) जिल्हा शल्यचिकित्सक यांचे स्तरावरुन आवश्यक असलेले यंत्रसामग्री, उपकरणे व सोई सुविधा उपलब्ध करुन दिले आहे.

गडचिरोली जिल्हयातील जलयुक्त शिवार योजने अंतर्गत पूर्ण झालेल्या कामांना निधी मिळण्याबाबत

(२४) ३८३०५ (११-०४-२०२२). श्री. धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयातील विविध जलयुक्त शिवार योजने अंतर्गत पूर्ण झालेल्या कामांना ३ ते ४ वर्ष होवून सुध्दा निधी मिळाला नसल्याने माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली जिल्हयातील जलयुक्त शिवार योजनेच्या कामाचा चौकशी अहवाल, चौकशी समितीने पूर्ण् केला असून निधी वितरणाबाबत शासनाच्या वतीने अद्याप कोणत्याही प्रकारची दखल घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंत्राटदारांकडून विहीत मुदतीत काम पूर्ण झाल्यानंतर त्यांनी केलेल्या कामाचा निधी मिळण्यास अतिविलंब होत असल्यामुळे कंत्राटदार गडचिरोली सारख्या नक्षलग्रस्त, अतिदुर्गम ठिकाणी काम करुनही निधी मिळत नसल्याने उदासिन आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करुन जलयुक्त शिवार योजनेचा निधी त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंकरराव गडाख (२८-०६-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.
(२) जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत गठीत चौकशी समितीच्या अहवालातील निकषानुसार गडचिरोली जिल्ह्यातील कामांसह इतर जिल्ह्यांचे कामांचे चौकशी अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे सदर कामांच्या निधी वितरणाबाबत निर्णय झालेला नाही.
(३) अंशत: खरे आहे.
(४) सदरचे चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालानुसार, दोषमुक्त कामांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासंदर्भात करावयाच्या उपाययोजनांच्या अंमलबजावणी करण्यासंदर्भात.

(२५) ३८४०९ (२४-०४-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती श्वेता महाले (चिखली), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलांच्या सदृढ आरोग्यासाठी शासन कोटयावधी रुपये खर्च करीत असून देखिल बालकांच्या कुपोषणात वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिरा भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी व आदिवासी पाड्यात बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी अंगणवाड्यांमध्ये बालकांना तसेच स्तनदा मातांना एकात्मिक बालविकास प्रकल्पाच्या माध्यमातून सकस आहाराचा पुरवठा करण्यात येत असून देखिल माहे एप्रिल, २०१९ पासून केलेल्या सर्वेक्षणात ० ते ६ वयोगटातील तब्बल १४६ कुपोषित बालकापैकी दोन बालके तीव्र कुपोषित असून १४४ बालके मध्यम कुपोषित असल्याची बाब निदर्शनास आली असून शहरात पोषण पुनवर्सन केंद्र नसल्याने बालकांची गैरसोय होत असल्याने शासकीय पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात पोषण पुनवर्सन केंद्र पुन्हा सुरू करण्याबाबतची मागणी माहे जानेवारी,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान मा. मंत्री सार्वजनिक आरोग्य यांच्याकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, ठाणे जिल्हयातील उल्हासनगर शहर येथे बालविकास प्रकल्पातर्गत २११ अंगणवाडया चालविण्यात येत असून तेथील ३ ते ६ वयोगटातील मुलांचे अंगणवाडी सेविकांनी सर्वेक्षण केले असता शहरातील ९२ मुलांचे वजन कमी असल्याची बाब तसेच शहापूर तालुक्यात गेल्या तीन महिन्यात २१९८ कुपोषित बालके निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, बुलढाणा जिल्ह्यात माहे डिसेंबर, २०२१ मध्ये जवळपास २००० बालके कुपोषित असून त्यापैकी ५०० बालके अतितीव्र १५०० बालके मध्यम कुपोषित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कुपोषणाचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी शासनाने सुरू केलेल्या विविध योजनांचा लाभ बालकांना मिळतो किंवा कसे याची पहाणी करण्यात येते काय,

(६) असल्यास, कुपोषण व बालमृत्यू रोखण्यासाठी शासनाने केलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याबाबतची सदयस्थिती काय आहे ?

ॲड. यशोमती ठाकूर (१५-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) माहे फेब्रुवारी, २०२२ च्या मासिक प्रगती अहवालानुसार मिरा भाईंदर महानगर पालिका क्षेत्रात तीव्र कुपोषित बालके २६३ असून मध्यम कुपोषित बालके १७४५ आहेत. मिरा भाईंदर महानगर पालिका क्षेत्रात पोषण पूनवर्सन केंद्र उपलब्ध नाहीत.

(३) बाल विकास प्रकल्प अधिकारी, उल्हासनगर (नागरी) या कार्यालयांतर्गत २११ अंगणवाडया चालविण्यात येत असून, माहे फेब्रुवारी, २०२२ च्या मासिक प्रगती अहवालानुसार सदर प्रकल्प क्षेत्रात तीव्र कुपोषित बालके २३७ असून मध्यम कुपोषित बालके २०६२ आहेत. तसेच शहापूर तालुक्यात माहे फेब्रुवारी, २०२२ च्या मासिक प्रगती अहवालानुसार तीव्र कुपोषित बालके ४७१ असून मध्यम कुपोषित बालके २३७३ आहेत.

(४) बुलढाणा जिल्हयात डिसेंबर, २०२१ च्या मासिक प्रगती अहवालानुसार सदर प्रकल्प क्षेत्रात तीव्र कुपोषित बालके १४१६ असून मध्यम कुपोषित बालके ११४३२ आहेत.

(५) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ६ महिने ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर, स्तनदा मातांना THR व ३ ते ६ वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२) तसेच आदिवासी प्रकल्पामध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु आहे.

(अ) अमृत आहार योजने अंतर्गत गरोदर व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो व ६ महिने ते ६ वर्ष

वयोगटातील बालकांना आठवडयातून ४ दिवस अंडी व केळी देण्यात येते. या ४ दिवसांमध्ये शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडे देण्यात येते.
(ब) अमृत आहार योजनेंतर्गत गरोदर व स्तनदा माता यांच्यासाठी प्रति लाभार्थी एक वेळचा चौरस आहारासाठी खर्च रु.३५/- व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना अंडी/केळी यासाठीचा प्रति लाभार्थी नियमित आहाराव्यतिरिक्त रु.६/- इतका खर्च करण्यात येतो.
३) तसेच राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बाल विकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरिक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतात.
४) राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA) समुदाय आधिरित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICTRTM) व जन आंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

सदर उपाययोजना लाभार्थ्यापर्यंत पोहचतात की नाही याबाबत जिल्हा कार्यक्रम अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी व मुख्यसेविका यांचे कडून पाहणी करण्यात येते.
(६) सद्य:स्थितीत एकात्मिक बाल विकास सेवा योजनांतर्गत सर्व जिल्हयांना नियमित पोषण आहार पुरवठा करण्यात येत असून २९ एप्रिल २०२२ पासून नियमितपणे अंगणवाडया सुरू झाल्या आहेत.

वणी (जि. यवतमाळ) येथील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पूर्णवेळ नियुक्ती करण्याबाबत

(२६) ३८५०६ (२४-०४-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहरात शिक्षणासाठी येत असलेल्या गावातील विद्यार्थ्यांना निवासासाठी वसतिगृहात प्रवेश मिळविण्यासाठी वैद्यकीय प्रमाणपत्राची आवश्यकता असते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी पूर्ण वेळ नसल्याने विद्यार्थ्यांना वेळेवर वैद्यकीय प्रमाणपत्र मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पूर्णवेळ नियुक्ती करावी अशी मागणी नागरिकांनी वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय यांना दिलेल्या निवेदनातून दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याअनुषंगाने वणी येथील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पूर्णवेळ नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१६-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) ग्रामीण रुग्णालय वणी येथे एकूण ७ वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून त्यापैकी ६ नियमित व १ बंधपत्रित स्वरुपात कार्यरत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात घरेलू कामगार कल्याण मंडळाची पुर्नरचना न झाल्याबाबत

(२७) ३८५२१ (१२-०४-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील घरेलू कामगार कल्याण मंडळाची पुनर्रचना न झाल्याने २० लाख पेक्षा जास्त महिला कामगार उपेक्षित असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने घरेलू कामगार कल्याण मंडळाची स्थापना करुन १३ कोटी रुपयांच्या निधीतून मंडळाने ६० वर्षे वयाच्या पुढील महिला कामगारांना १० हजार रु. निधी वितरीत केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने घरेलू कामगार कल्याण मंडळाची पुर्नरचना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१७-०६-२०२२) : (१) हे खरे नाही. दि.२७.०३.२०१५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे विकास आयुक्त (असंघटित कामगार) मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय मंडळ गठीत करण्यात आले आहे.

(२) दिनांक ०८.०८.२०१४ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ३१.०७.२०१४ रोजी वयाची ५५ वर्षे पूर्ण केलेल्या नोंदित घरेलू कामगारांना रु.१०,०००/- सन्मानधन योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

(३) घरेलू कामगार कल्याण मंडळाची पुनर्रचना करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील जलयुक्त शिवार अभियानाच्या चौकशीसाठी नेमलेल्या एसआयटीने कामामध्ये केलेली अनियमितता

(२८) ३८८१० (१२-०४-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील जलयुक्त शिवार अभियानाची चौकशी करण्यासाठी शासनाने नेमलेल्या एसआयटी ने सुमारे ७१ टक्के कामामध्ये आर्थिक व प्रशासकीय अनियमितता झाल्याचा अहवाल शासनास सादर केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने संबंधीत दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंकरराव गडाख (२८-०६-२०२२) : (१) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत झालेल्या कामांपैकी, महालेखापाल यांनी तपासणी केलेली ११२८ कामे व क्षेत्रीय स्तरावर प्राप्त ६७१ तक्रारी अशा एकूण १७९९ प्रकरणांपैकी चौकशी समितीने ९३१ प्रकरणी (५१.७५%) खुल्या चौकशीची व ३९६ प्रकरणी (२२%) प्रशासकीय / विभागीय कारवाईची शिफारस केलेली आहे. चौकशी समितीने एकूण १७९९ प्रकरणांपैकी १३२७ प्रकरणी म्हणजेच ७३.७६% कामांमध्ये कारवाईची शिफारस केलेली आहे. तसेच, जलयुक्त शिवार अभियानांतर्गत झालेल्या वरील कामाव्यतिरिक्त इतर सर्वच कामांची चौकशी समितीच्या अहवालातील निकषानुसार चौकशी करून कारवाई करण्याची चौकशी समितीने शिफारस केली आहे.

(२) चौकशी समितीच्या अहवालातील निकषाच्या अनुषंगाने चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत सर्व संबंधित क्षेत्रीय यंत्रणांना कळविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणातील पाणी कोटाबाबत

(२९) ३९२८१ (०५-०४-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणातून मिळणाऱ्या पाण्याचा कोटा कमी करून पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यास हा पाण्याचा कोटा देण्याबाबत दिनांक २२ एप्रिल २०२१ रोजी वा त्यासुमारास जलसंपदा विभागाने आदेश काढून पुन्हा लगेचच ते रद्द करण्याचे आदेश काढण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर इंदापूर तालुक्यात पाणी वितरीत करण्याचे आदेश काढणे व लगेच सदरचे आदेश रद्द करणे याबाबत जलसंपदा विभागाचे धोरण काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर आदेश काढणाऱ्या व रद्द करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२७-०६-२०२२) : (१) हे खरे नाही,

उजनी जलाशयाच्या उर्ध्वबाजूस बिगर सिंचन पाणी वापरातून उपलब्ध होणारे सांडपाणी उजनी जलाशयातून उचलून शेटफळगढे येथे नवीन मुठा उजवा कालव्यात कि.मी. १६१ येथे सोडून खडकवासला प्रकल्पाचे सिंचन स्थिरीकरण करणेच्या सर्वेक्षणाचे शासन पत्र दिनांक २२/०४/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आले. यामध्ये उजनी जलाशयातून पाणी उचलण्याचे /आरक्षण करण्याचे कोणतेही नियोजन शासन स्तरावर नाही.

(२) सदर दिनांक २२/४/२०२१ चे शासन पत्र निर्गमित केल्यानंतर उजनी प्रकल्पावर अवलंबित असलेल्या सर्व क्षेत्रात, उजनी प्रकल्पातून पाणी उचलणार असल्याचा भ्रम निर्माण होऊन जनमानसात असंतोषाची भावना निर्माण झाली.

उजनी जलाशयातून या योजनेसाठी पाणी आरक्षण करण्याचे कसलेही नियोजन नसले तरीही जनतेत पसरलेल्या असंतोषाचा विचार करून सद्य:स्थितीत दिनांक २२/०४/२०२१ चे शासन पत्र रद्द करण्यात आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील गोसेखुर्द प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झालेल्या गावात नागरी सुविधा देण्याबाबत

(३०) ३९४४४ (११-०४-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील इंदिरासागर प्रकल्प म्हणजेच गोसेखुर्द प्रकल्प सद्य:स्थितीत पूर्णत्वास आला असून प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झालेल्या गावात १८ नागरी सुविधा मिळत नसल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावातील नागरिक, शेतकऱ्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी व तहसिलदारांना वारंवार निवेदन दिले असूनही शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गोसेखुर्द प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झालेल्या गावात नागरी सुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२९-०६-२०२२) : (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जलसंपदा विभाग, सातारा येथील वांगना प्रकल्पातून प्रस्तावित क्षमतेपेक्षा कमी पाणी उचलण्यात येत असल्याबाबत

(३१) ३९६०३ (१२-०४-२०२२). श्री.महेश शिंदे (कोरेगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभाग, सातारा येथील वांगना प्रकल्पाचा मागील ५ वर्षातील सिंचनाचा अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वांगना प्रकल्पातून प्रस्तावित क्षमतेच्या फक्त ५ टक्केच पाणी उचलण्यात येत आहे, त्यामुळे तेथील शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (०४-०७-२०२२) : (१) होय.

(२) नाही.

वांगना प्रकल्प अद्यापही बांधकामाधीन असून वितरण व्यवस्थेची कामे अपूर्ण आहेत. तथापि, कमी पाणी वापराबाबत शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागत असल्याबाबतची कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पवती (ता.गोसेखुर्द, जि. भंडारा) प्रकल्पाच्या बॅकवॉटर पाण्यामुळे तेथील शेतकऱ्यांच्या शेतीचे झालेल्या मोठया नुकसानीबाबत

(३२) ३९६९२ (११-०४-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवती (ता.गोसेखुर्द, जि. भंडारा) प्रकल्पाचे बॅकवॉटर पाणी भंडारा, साळवा, रूयाड, टेकेपार येथील शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये जावून तेथील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचे दिनांक १०/०१/२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांच्या शेतीचे झालेले नुकसान तसेच जमिनीत पाणी राहत असल्याने सदर शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत करून त्यांना शासनाद्वारे मोबदला देण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने शेतकऱ्यांच्या शेतीचे झालेले नुकसानीचा मोबदला मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२९-०६-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) बाधित क्षेत्राचे MRSAC मार्फत D.G.P.S. व DRONE पध्दतीने तसेच कार्यक्षेत्रावर प्रत्यक्ष पाहणी करुन सर्व्हेक्षणाअंती अशा बाधित क्षेत्राचे भुसंपादन/पुनर्वसनाची कार्यवाही करण्यात येईल.

(३) वरील मुद्दा क्र. २) मध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चिकमहूद (ता.सांगोला, जि.सोलापूर) येथील नीरा उजवा कालव्याच्या दहामोरी या जलसेतूच्या मजबुतीकरणाच्या कामास निधी मिळणेबाबत

(३३) ३९७५९ (११-०४-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिकमहूद (ता.सांगोला, जि.सोलापूर) येथील नीरा उजवा कालव्यावरील ब्रिटीशकालीन दहामोरी या जलसेतूच्या मजबुतीकरणाचे काम निधी अभावी संथ गतीने सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नीरा उजव्या कालव्यातून सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा या तालुक्यातील शेतीला पाणी पुरवठा होत असून दहामोरी जलसेतूकरिता रुपये ९ कोटींची तरतूद अपेक्षित आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कालव्यावरील दहामोरी या जलसेतूचेच्या मजबुती करणाचे काम पूर्ण होण्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१५-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

जलसेतूच्या एकूण कामाची किंमत रू. ९.२४ कोटी इतकी असून सद्य:स्थितीत त्यावर रू. ६.७९ कोटी एवढा खर्च झाला आहे व काम प्रगतीत आहे.

(३) सदरचे काम सांगोला शाखा कालवा प्रकल्पांतर्गत येत असून हा प्रकल्प प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेत समाविष्ट आहे. या प्रकल्पास पूरेसा निधी उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गुजरातमधील नर्मदा व तापी नदीजोड/वळण योजनेतून नंदुरबार जिल्ह्याला ५ अब्ज घनफूट पाणी उपसा सिंचनासाठी देणेबाबत

(३४) ३९७६७ (०१-०४-२०२२). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नर्मदा व तापी नदीजोड/वळण योजनेतून नंदुरबार जिल्ह्याला ५ अब्ज घनफूट (टि.एम.सी.) पाणी उपसा सिंचनासाठी देण्याचे निश्चित करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत आजपर्यंत झालेली चर्चा व प्रत्येक बैठकीच्या इतिवृत्तात या बाबीचा समावेश केला आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(३) असल्यास, सदर योजनेचे सर्वेक्षणाच्या अंदाजपत्रकास शासनाची मंजूरी आहे काय, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त योजनेतून नंदुरबार जिल्हयाला पाणी उपसा सिंचनासाठी देणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

श्री. जयंत पाटील (२३-०६-२०२२) :(१) अंशत: खरे आहे.

नर्मदा जल लवादाच्या अंतिम निवाडा व निर्णयानुसार महाराष्ट्राच्या वाट्यास येणारी १०.८९ अ.घ.फु. पाणी वापरापैकी ५.५९ अ.घ.फू. पाणी नर्मदा खोऱ्यातून तापी खोऱ्यामध्ये नर्मदा तापी वळण योजनेद्वारे वळविणेसाठी प्रस्तावित आहे. तसेच उर्वरीत ५ अ.घ.फू. पाणी उकाई धरणाच्या पश्च जलाशयातून उपसा सिंचन योजना द्वारे उचलणे प्रस्तावित आहे.

या दोन्ही योजनांचा पाणीवापर नंदुरबार जिल्ह्यातील क्षेत्रात प्रस्तावित आहे. तसेच दोन्ही योजना सर्वेक्षण, अन्वेषण व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेच्या स्तरावर आहेत व प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करण्याच्या कार्यवाहीत आहेत.

(२) १) उकाई धरणाच्या पश्च जलाशयातुन ५ अ.घ.फू. पाणीद्वारे उपसा सिंचन योजना :-

दिनांक २३.११.२०२१ रोजी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांचे सोबत उकाई धरणाच्या पश्च जलाशयातून ५ अ.घ.फू पाणी उपसा सिंचन योजना द्वारे वापरणेबाबतच्या पुर्व व्यवहार्यता अहवाल व सर्वेक्षणाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत दिनांक २३.११.२०२१ रोजी बैठक संपन्न झाली आहे. बैठकीच्या अनुषंगाने सदर अहवालास शासनाने दि.०२.०२.२०२२ च्या पत्रान्वये तत्वत: मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने सर्वेक्षणाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

२) नर्मदा तापी वळण योजना ता. धडगाव जि.नंदुरबार :-

शासनाने दिनांक ०७.११.२००८ च्या पत्रान्वये नर्मदा खोऱ्यातील ५.५९ अ.घ.फू. पाणी तापी खोऱ्यात वळवण्यासाठी प्राथमिक अन्वेषण अहवालास मान्यता दिली आहे. तसेच, दिनांक २४.११.२०२१ रोजी मा. मंत्री जलसंपदा व लाभक्षेत्र विकास यांच्या अध्यक्षतेखाली व मा. मंत्री आदिवासी विकास विभाग यांचे समवेत आढावा बैठक संपन्न झाली आहे.

सदर बैठकीत नर्मदा खो-यातील ५.५९ अ.घ.फू पाणी हे नर्मदा खो-यातील महाराष्ट्र राज्यातील नंदुरबार जिल्ह्याच्या धडगाव तालुक्यात जास्तीत जास्त प्रमाणात वापरले जाण्याच्या दृष्टीने धडगाव तालुक्यातील एकूण लागवडी लायक क्षेत्राचा अभ्यास करुन जास्तीत जास्त क्षेत्र सिंचनाखाली येण्यासाठी तेथे बंधारे/बॅरेज/ल.पा/उपसा सिंचन योजता प्रस्तावीत करुन ठिबक/तुषार सिंचनाच्या वापरासह सविस्तर अहवाल तयार करुन फेर नियोजन करावे असे निर्देश देण्यात आले आहेत.

(३) व (४)

१) उकाई धरणाच्या पश्च जलाशयातुन ५ अ.घ.फू. पाणीद्वारे उपसा सिंचन योजना :-

कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचे दि.२७/०४/२०२२ पत्रान्वये सर्वेक्षणाचे अद्यावत दरसूची (सन २०२१-२२) नुसार अंदाजपत्रक शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात आले आहे.

सर्वेक्षण व अन्वेषणासाठीच्या अंदाजपत्रकास शासनाची प्रशासकीय मान्यतेनंतर सर्वेक्षण अन्वेषण करुन प्रकल्प अहवाल तयार करण्यात येईल.

२) नर्मदा तापी वळण योजना ता. धडगाव जि.नंदुरबार:-

शासन निर्णय दि. ०९.०८.२०११ अन्वये नर्मदा खोऱ्याचे पाणी तापी खोऱ्यात वळवणेच्या प्रकल्पाच्या सविस्तर सर्वेक्षणाच्या रु. १२.९१ कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकास शासनाने सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

नर्मदा तापी वळण योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल रु. १५३३ कोटी रकमेचा तयार करुन राज्य तांत्रिक सल्लागार समिती यांचेकडे दि.१८/०५/२०११ रोजी सादर केलेला होता. सदरप्रकल्प अहवाल राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांना शेरेपुर्ततेसह पुन्हा सादर करणेच्या कार्यवाहीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वसमत (जि. हिंगोली) मराठवाड्यातील पूर्णा पाटबंधारे विभागाअंतर्गत व्यवस्थापन दुरुस्तीसाठी तात्काळ निधी उपलब्ध करुन देणेबाबत

(३५) ३९९७७ (११-०४-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमत (जि. हिंगोली) मराठवाड्यातील पुर्णा पाटबंधारे विभागाच्या अधिपत्याखालील पुर्णा प्रकल्पाचे कालव्यावर सध्या रब्बी हंगाम (सन २०२१-२२) चालू असून प्रकल्पाच्या कालव्यातील गाळ व भरावाची कामे अद्याप झालेली नसल्याचे तसेच अपुरी यंत्रसामुग्री असल्याने केवळ १० टक्केच कामे झाल्यामुळे कालव्यांच्या अंतिम भागातील

बागायतदार शेतकरी सिंचनापासून वंचित राहिले असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमत कालवा व्यवस्थापन दुरुस्तीची (M&R) कामे तात्काळ करण्यासाठी स्थानिक प्रशासनाकडे लाभार्थी शेतकरी व बागायतदार यांचेकडून वारंवार तगादा लावून मागणी करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित शेतकरी व बागायतदार यांच्या तक्रारी व मागणीनूसार वसमत कालवा दुरुस्तीची (M&R) निधी उपलब्ध करण्यासंदर्भात जिल्हा प्रशासनाने रक्कम रुपये ५ कोटी ४४ लाख ४४ हजार इतक्या रक्कमेचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याचसंदर्भात मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी देखील जिल्हा प्रशासनाने मागणी करण्यांत आलेला रु. ५ कोटी ५२ लाख इतक्या रक्कमेच्या प्रस्तावाधिन निधी तातडीने उपलब्ध करुन देण्यांत यावा, असेही त्यांचे दि. १३ जानेवारी, २०२२ रोजी पत्रान्वये जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री तसेच प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांचेकडे केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२८-०६-२०२२) : (१) होय हे अंशत: खरे आहे.

उपलब्ध शासकीय यंत्रसामुग्री व सेवाभावी संस्थेकडील यंत्रसामुग्रीद्वारे कालवा दुरुस्ती करुन सन २०२१-२२ मध्ये सिंचन राबविण्यात आले आहे व लाभार्थ्यांना जास्तीत जास्त सिंचनाचा लाभ देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

(२) होय, हे अशंत: खरे आहे. शेतकरी व बागायतदार कालवा दुरुस्तीबाबत आग्रही आहेत.अद्याप याबाबत लेखी निवेदन क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झालेले नाही.

(३) हे खरे नाही.

असा प्रस्ताव जलसंपदा विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(४) होय हे खरे आहे.

रु.५.४४ कोटी पूर्णा पाटबंधारे विभागांतर्गत कालवा दुरुस्तीच्या (M&R) कामासाठी मिळणेबाबत मा.लोकप्रतिनिधीचे दिनांक १३.०१.२०२२ चे निवेदन प्राप्त आहे.

(५) कालवा दुरुस्तीच्या (M&R) कामासाठी बिगर सिंचन/सिंचन कृती आराखडा सन २०२२-२३ मध्ये पाणीपट्टी वसुलीद्वारे उपलब्ध निधीच्या मर्यादेत देखभाल दुरुस्तीची कामे कामांचा प्राधान्यक्रम विचारात घेऊन करण्यात येतील. तसेच पूर्णा कालव्यावरील क्षतिग्रस्त बांधकामे दुरुस्ती, पुनर्बाधणी करणे व इतर आवश्यक कामे विशेष दुरुस्ती अंतर्गत प्रस्तावित करणेसाठी बाह्य यंत्रणेमार्फत सर्वेक्षण करणेच्या कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. सर्वेक्षणानंतर विशेष दुरुस्ती अंतर्गत सविस्तर अंदाजपत्रके क्षेत्रिय स्तरावर तयार करुन शासन स्तरावर मान्यता मिळाल्यानंतर सदरील कामे विशेष दुरुस्ती अंतर्गत हाती घेण्याचे नियोजित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अनेक धरणांतील गाळ काढणेबाबत

(३६) ४००८२ (११-०४-२०२२). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक धरणांमध्ये मोठया प्रमाणावर गाळ साचलेला असल्याने पाणी साठवणूक क्षमता कमी झालेली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कित्येक वर्षापासून धरणांतील गाळ काढलेला नसून काही प्रायोगिक तत्वावर शासन धरणातील गाळ काढण्यासाठी काय प्रयत्न् करणार आहे,
(३) असल्यास, सदरहू गाळ काढण्यासाठी सरकारकडून खर्च न होता काही खाजगी व्यक्तीकडून हा गाळ काढू शकतो याबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने धरणातील गाळ काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२७-०६-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेने आत्तापर्यंत महाराष्ट्रातील मोठ्या व मध्यम प्रकल्पांचे गाळ सर्वेक्षण अभ्यास केलेला आहे. यामध्ये आजपर्यंत १६८ प्रकल्पांचे गाळ सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. त्यापैकी काही धरणांच्या उपयुक्त साठ्यामध्ये काही प्रमाणात गाळ साठलेला आहे.
(२) राज्यातील मोठ्या पाटबंधारे प्रकल्पातून गाळ व वाळू/रेती मिश्रीत गाळ निष्कासनाबाबत, राज्य शासनाने दिनांक ०३/०८/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार ५ निवडक पथदर्शी प्रकल्पातून सदर कामे करण्याचे धोरण स्विकारले आहे. त्यानुषंगाने या प्रकारची कामे राज्यात पहिल्यांदाच हाती घेण्याचा विचार असून धरणात साचलेल्या गाळाची गुणवत्ता व त्याच्या परिमाणाचे विश्वसनीय आकलन होण्यास्तव माती नमुन्याच्या सर्वेक्षणाची व चाचणीची प्रक्रीया हाती घेण्यात येत आहे. एकंदरीतच स्वीकृत केलेल्या धोरणानुसार निवडक जलाशयातून निष्कासीत करावयाच्या एकूण गाळाचे परिमाण ठरवून, त्यातून प्राप्त होणाऱ्या वाळू करिता शासन खाती महसूल जमा करणे अभिप्रेत आहे. याकरिता पारदर्शकरीत्या प्रचलित पद्धतीनुसार ई-निविदा बोलावून शासनास सर्वाधिक महसूल देणा-या अभिकरणाची निवड करण्याचे नियोजन आहे. या पद्धतीने निवडलेल्या अभिकरणांनी निविदेतील सर्व अटी शर्तीचे पालन करून स्वखर्चाने गाळ निष्कासन करून, त्यातून वाळू/रेती वेगळी करून, गाळ घेऊन जाण्यास इच्छूक शेतकऱ्यांच्या वाहनात मोफत भरून द्यावे, असे अपेक्षित आहे. जेथे गाळ उचलण्यास शेतकरी इच्छुक नसेल तेथे सदर गाळ नियमानुसार निश्चित केलेल्या जागेपर्यंत अभिकरणानी स्वखर्चाने वाहतूक करून त्यांची विल्हेवाट लावावी, असे बंधनकारक राहील.
(३) होय.
(४) सदर प्रकरणी अद्याप कोणत्याही प्रकल्पावर काहीही काम झालेले नसल्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही. सदर धोरणाच्या अंमलबजावणीकरिता सन २०१८-१९ मध्ये ५ निविदा काढण्यात आल्या होत्या. परंतु त्याबाबत पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळांनी ठरविल्याप्रमाणे ते रद्द करण्यात आले. या प्रक्रियेत आलेल्या अनुभवाच्या अनुषंगाने प्रारूप निविदा मध्ये आवश्यक सुधारणा करून ई- निविदा प्रक्रीया पुन्हा राबविण्याचे नियोजन आहे.
(५) या बाबत कोणतेच विलंब झाले नसून कामे प्रगतीपथावर आहे.

शेटफळे (ता. आटपाडी जि. सांगली) येथील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

(३७) ४०११६ (०१-०४-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेटफळे (ता. आटपाडी जि. सांगली) येथील टेंभू उपसा सिंचन प्रकल्पाअंतर्गत कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे काम प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी आटपाडी तालुक्यातील टेंभू योजनेअंतर्गत किती कोल्हापूर पध्दतीचे बंधाऱ्याचे कामे प्रलंबित आहेत,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त बंधाऱ्यांची कामे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. जयंत पाटील (१५-०६-२०२२) : (१) होय.
(२) आटपाडी तालुक्यातील टेंभू योजनेअंतर्गत ३२ बंधाऱ्यापैकी १० बंधारे पूर्ण असून, ७ बंधारे प्रगतीत आहेत. उर्वरीत १५ बंधाऱ्याची कामे अद्याप हाती घ्यावयाची आहेत.
(३) अपूर्ण ७ को.प. बंधारा कामापैकी अनुसेवाडी, शेटफळे क्र.१ व २ तसेच बोंबेवाडी (पाटील मळा) या ४ बंधाऱ्यांच्या उर्वरित कामाची निविदा कार्यवाही करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत अंतिम करुन त्यांच्या उर्वरित कामाचा समावेश प्रापणसूची २०२१-२२ मध्ये करण्यात आला आहे. त्यापैकी ३ बंधाऱ्यांची निविदा अंतिम करुन उर्वरीत कामाची निविदा नव्याने निश्चित करण्यात येत आहे. प्रकल्पामधील उर्वरीत १५ को.प. बंधारा कामे निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्यात येत आहेत. टेंभू प्रकल्पाची कालवा कामे प्राधान्याने पूर्ण करुन उपसा केलेले पाणी दुष्काळी भागात पोहचविणे गरजेचे असल्याने उपलब्ध निधीत कालवा कामे पूर्ण करणेत आली. त्यामुळे बंधारा कामास पुरेसा निधी उपलब्ध झाला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंतरगाव (ता.कळंब, जि.यवतमाळ) तलावाचे उजवा आणि डावा कालवा दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याबाबत

(३८) ४०३६१ (११-०४-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंतरगाव (ता.कळंब, जि.यवतमाळ) तलावाचे उजवा आणि डावा कालवा दुरुस्ती गेट बसविणे, कालवा सफाई करणे कालव्यावर पुलाचे बांधकाम करणे इ. कामांकरिता दोन वर्षापूर्वी रुपये ३ कोटींचा निधी मंजूर करण्यात करण्यात येवूनही सदरहू कामे अपूर्ण असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कालव्याच्या दुरुस्तीची कामे अपूर्ण ठेवणाऱ्या दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करुन शेतकऱ्यांना शेती सिंचनासाठी पाणी उपलब्ध व्हावे याकरिता अंतरगाव तलाव डावा आणि उजवा कालवा दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२७-०६-२०२२) : (१) होय खरे आहे.
अंतरगांव लघु प्रकल्पावर सदर काम विशेष दूरूस्ती अंतर्गत मंजुर असुन सदर कामाचे कार्यारंभ आदेश कंत्राटदारास दि.२३.३.२०२० रोजी देण्यात आले होते. मुळ निविदेचा कालावधी दि.२२.९.२०२१ पर्यंत होता. तथापि, कोरोना कालावधी मधील निर्बंधांचा विचार करता दि.३१.८.२०२२ पर्यंत मुदतवाढ मंजुर आहे.
(२) सदर काम प्रगतीपथावर असुन सद्यस्थितीत ६० टक्के काम पुर्ण झाले आहे व विहित मुदतीत काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) कोरोना-२०१९ च्या प्रतिबंधात्मक उपाययोजना लागु असल्याने कामास विलंब झाला आहे. काम विहित मुदतीत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

दौंड तालुक्यांसह (जि.पुणे) राज्यात मोठ्या प्रमाणावर चिबाड शेतजमिनी निर्मुलन करण्यासाठी धोरण ठरविण्याबाबत

(३९) ४०४१२ (११-०४-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड तालुक्यांसह (जि.पुणे) राज्यात मोठ्या प्रमाणावर चिबड जमिनी असून चिबड जमिनीचे निर्मुलन करण्यासाठी धोरण ठरविण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ ऑक्टोबर २०२० वा त्यासुमारास केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने पहाणी केली आहे काय, पहाणीत काय आढळून आले आहे, तदृअनुषंगाने उक्त धोरण ठरवून शेतकऱ्यांच्या जमिनी नापिकी कडून सुपिकीकडे आणण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२७-०६-२०२२) : (१) लोकप्रतिनिधींची दिनांक २१/१०/२०२० वा त्या सुमारास अशा प्रकारची मागणी या कार्यालयाकडे अथवा संबंधित क्षेत्रिय कार्यालयाकडे प्राप्त नाही. परंतु या संदर्भात मा. श्री. राहूल कुल मा.विधानसभा सदस्य, दौंड यांनी जिल्हाधिकारी, पुणे यांना दौंड तालुक्यातील चिबाड शेतजमीनी निर्मुलन व शेतक-यांच्या प्रश्नासंदर्भात चर्चा करून धोरण ठरविण्यासाठी बैठक आयोजित करण्याबाबत दिनांक २९/०६/२०२१ रोजी पत्र दिले होते.
(२) जिल्हाधिकारी पुणे व श्री राहुल कुल, मा. विधानसभा सदस्य, दौंड यांचे समवेत दि.०८/०७/२०२१ रोजी बैठक संपन्न झाली. नवीन मुठा उजवा कालवा लाभक्षेत्रातील खराबा क्षेत्राची पाहणी दर वर्षी करण्यात येते. सध्य:स्थितीत उघड्या चरासाठीच्या योजनांचे आर्थिक मापदंड निश्चत करण्यासाठी नियोजन व वित्त विभागाने कळविल्यानुसार, कृषी विभाग, जलसंपदा विभाग, रोजगार हमी योजना विभाग आणि मृद व जलसंधारण विभाग या चारही विभागाने एकत्रित अभ्यास करुन आर्थिक व तांत्रिक निकष निश्चित करण्यासाठी दिनांक २५/०५/२०२२ च्या शासन निर्णयान्वये अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुषंगाने चर योजनेचे आर्थिक व तांत्रिक मापदंड निश्चित करावयाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सदर मापदंड सुधारित केल्यानंतर आवश्यकतेनुसार चर योजना हाती घेण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पेनटाकळी (जि.बुलढाणा) प्रकल्पातून कालव्याद्वारे शेतीच्या सिंचनाकरिता पाणी सोडण्याबाबत

(४०) ४१४३६ (१२-०४-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेनटाकळी (जि.बुलढाणा) प्रकल्पातून कालव्याद्वारे शेतीच्या सिंचनाकरिता पाणी सोडण्यात यावे म्हणून जानेफळ परिसरातील शेतकऱ्यांनी दिनांक ११ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास कालव्याच्या काठावर आमरण उपोषण सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी घाटनांद्रा येथील शेतकऱ्यांनी दिनांक ०४.०१.२०२२ रोजी वा त्या सुमारास संबधित विभागाला लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्‌अनुषंगाने सदरहू प्रकल्पातून कालव्याद्वारे शेतीच्या सिंचनाकरिता पाणी सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२९-०६-२०२२) : (१) होय,
पेनटाकळी प्रकल्पातुन कालव्याद्वारे शेतीच्या सिंचनाकरीता पाणी सोडण्यात यावे म्हणुन जानेफळ परिसरातील शेतक-यांनी दि.११ जानेवारी २०२२ रोजी उपोषण सुरु केले होते. त्यानंतर कार्यकारी अभियंता, खडकपूर्णा प्रकल्प विभाग, देऊळगाव राजा व कार्यकारी अभियंता, बुलडाणा पाटबंधारे विभाग, बुलडाणा यांनी १ ते ११ कि.मी. मधील काम शासनाची मंजुरी घेऊन, करुन देण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.
(२) होय,
दिनांक १३/१२/२०२१ व ०४/०१/२०२२ रोजी विभागाला लेखी निवेदन दिले आहे.

(३) ० ते ११ कि.मी. मुख्य कालव्यामध्ये पाझर होतो व त्यामुळे या भागातील शेतक-यांचा पाणी सोडण्यास प्रचंड विरोध आहे. ११ कि.मी. पुढील शेतक-यांची सिंचनासाठी पाणी सोडण्याची मागणी आहे. त्या अनुषंगाने कालव्यातुन पाणी सोडणेसाठी व पाझरावर कायमस्वरुपी उपाययोजना करणेकरीता मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती व मुख्य अभियंता (वि.प्र.) जलसंपदा विभाग, अमरावती यांनी दिनांक १३/०१/२०२२ रोजी पेनटाकळी प्रकल्पांची संयुक्त पाहणी केली व ० ते ११ कि.मी. मधील लाभधारकांचा पाणी सोडण्यास प्रचंड विरोध असुन अशा परिस्थीतीत देखील कालव्याव्दारे सिंचनाकरीता पाणी सोडले असता, ब-याच ठिकाणी कालवा फुटुन व पाझरामुळे लाभधारक शेतक-यांचे शेतीचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संपुर्ण कालवा दुरुस्तीच्या उपाय योजना होत नाही तोपर्यंत कालव्यामधुन पाणी सोडणे योग्य नसल्याचे प्रथम दर्शनी दिसुन आले. दिनांक १३/०१/२०२२ रोजी संयुक्त पाहणीदरम्यान ० ते ११ कि.मी. मधील कालव्याची सर्व नादुरुस्त बांधकामे व गळती प्रतिबंधक उपाययोजना बांधकाम विभागाने पुर्ण करण्याचे सुचीत करण्यात आले. त्यानुसार क्षेत्रीय स्तरावरून उपाययोजने बाबत तांत्रिक कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

तेल्हारा (अकोट, जि.अकोला) येथील वान प्रकल्प कालव्यांची साफसफाई न झाल्याबाबत

(४१) ४१४८६ (०१-०४-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तेल्हारा (अकोट, जि.अकोला) येथील वान प्रकल्प कालव्यांची साफसफाई न झाल्याने रब्बी हंगामासाठी सोडलेले पाणी वाट न मिळाल्याने इतरत्र जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बंधाऱ्यांच्या साफसफाई करीता निधी उपलब्ध नसल्याचे स्थानिक प्रशासनाचे म्हणणे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त बंधाऱ्याची तातडीने सफाई करुन पाण्याला वाट मिळणेकरिता कोणत्या उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१५-०६-२०२२) : (१) हे खरे नाही,
दिनांक १३/११/२०२१ रोजी झालेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये दिनांक २०/११/२०२१ पासून रब्बी सिंचनाकरिता कालव्याद्वारे पाणी सोडण्याचे नियोजित करण्यात आले. त्यापूर्वी यांत्रिकी विभागामार्फत उपलब्ध मशीनद्वारे व सिंचन वसुलीच्या उपलब्ध निधी मधून कालव्याचे अत्यावश्यक असलेली साफसफाईची कामे करण्यात आली व कालव्याची चाचणी घेऊन दिनांक २५/११/२०२१ पासून नियमित सिंचन सुरु करण्यात आले असून कालवा फुटणे, कालव्याचे पाण्यामुळे शेतीचे नुकसान होणे, वाट न मिळाल्यामुळे पाणी इतरत्र जाणे अशा प्रकारच्या घटना लाभक्षेत्रामध्ये घडल्या नाहीत. रब्बी हंगाम सुरळीत पणे पार पडला असून प्रकल्पावर एकूण ८७१६ हेक्टर सिंचन झाले आहे.
(२) हे खरे नाही,
यांत्रिकी विभागामार्फत तसेच सिंचन वसुलीच्या उपलब्ध निधी मधून कालव्याच्या साफसफाई व सिंचनाच्या दृष्टिने अत्यावश्यक कामे (मुख्य कालवा व त्यावरील शाखा कालवा व वितरीकावरील ठराविक ठिकाणची देखभाल व दुरुस्तीची कामे) करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात डायलेसीस सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

(४२) ४१६६६ (२४-०४-२०२२). : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात सन २०१७- १८ मध्ये डायलेसीस करण्याचे चार यंत्र खरेदीसाठी १ कोटी ४७ लक्ष रुपयाचा निधी हाफकिन संस्थेला दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हाफकिनने या डायलेसीस यंत्रांचा अद्यापपर्यंत पुरवठा केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,यानंतर सन २०१९ मध्ये आयुक्त,आरोग्य यांनी २५ डायलेसीस यंत्रांची सुविधा असलेले केंद्र उभारण्याचे मान्य केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,या रुग्णालयात डायलेसीस सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१५-०६-२०२२) : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, औरंगाबाद करीता डायलेसिस मशीनची आवश्यकता असल्याने, सदर बाबींची निविदा प्रक्रिया पुर्ण झाली असून, दि. २५ फेब्रुवारी, २०२२ रोजी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ अंतर्गत खरेदी कक्ष यांचे स्तरावरुन दि. २५ फेब्रुवारी, २०२२ अन्वये जिल्हा रुग्णालय, औरंगाबाद करीता ४ नग डायलेसिस मशीनचे पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हा परिषदेने कोरोना महामारीच्या कालावधीत खरेदी केलेल्या साहित्यात अधिकारी व कंत्राटी कामगारांनी केलेल्या अपहाराबाबत

(४३) ४१६९४ (११-०४-२०२२). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेने माहे मार्च, २०२० ते ३१ डिसेंबर, २०२० या कोरोना महामारीच्या कालावधीत खरेदी केलेल्या साहित्यात, अधिकारी व कंत्राटी कामगारांनी संगनमताने सुमारे ३५ कोटी रुपयांचा अपहार केल्याचे लेखी निवेदन सामाजिक कार्यकर्ते यांनी माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने अधिकारी व कंत्राटी कामगार यांच्यावर कारवाई करण्यासह अपहाराची रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०५-०७-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) संबधित सामाजिक कार्यकर्ते यांनी जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेस्तरावर निवेदन सादर केले असून निवेदनाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांना सादर करणेत आली होती. यास अनुसरुन संबधितांकडुन खुलासा मागविणेत आला आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

सोलापूर जिल्हा परिषदेतील वर्ग-१ व वर्ग-२ मध्ये सात पदे रिक्त असल्याबाबत

(४४) ४२१३५ (०१-०४-२०२२). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये येणाऱ्या सोलापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक पद रिक्त असून त्याचा तात्पुरता पदभार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे दिले आहे तसेच अक्कलकोट, सोलापूर पंचायत समिती या दोन पंचायत समितीचे गटविकास अधिकारी पदाचा पदभार प्रभारीवर सोपवण्यात आला वर्ग २ मध्ये येणारे मंगळवेढा, सांगोला, दक्षिण सोलापूर व मुख्यालयातील ग्रामपंचायत विभागाकडील सहाय्यक गट विकास अधिकाऱ्यांची चार पदे रिक्त असल्याचे वृत्त दिनांक ०३/०१/२०२२ रोजी वा त्या सुमारास प्रसिद्धीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर शिल्लक रिक्त पदे किती आहेत तसेच रिक्त पदे तात्काळ भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१०-०६-२०२२) :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये येणाऱ्या सोलापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडील प्रकल्प संचालक हे पद दिनांक ०३.०९.२०२० पासून रिक्त आहे व सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडे सोपवून कामकाज चालू आहे . सदर पद पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे .

तसेच, अक्कलकोट व उत्तर सोलापूर पंचायत समिती येथील गट विकास अधिकारी या रिक्त पदांवर बदलीने पदस्थापना देण्यात आलेली आहे .

तसेच पंचायत समिती, मंगळवेढा, सांगोला, दक्षिण सोलापूर व जिल्हा परिषद, सोलापूर मधील ग्रामपंचायत विभागातील सहायक गट विकास अधिकारी, गट ब संवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

ठाणे जिल्हा परिषदेने ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीच्या हद्दीत १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून हायमास्ट बसविण्याबाबत

(४५) ४२३६७ (२९-०३-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेने ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीच्या हद्दीत १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून हायमास्ट लावण्यात आले परंतू सदरच्या हायमास्टला स्वतंत्र विद्युत जोडणी न घेताच हे हायमास्ट बेकायदेशीरपणे विद्युत कनेक्शन घेऊन लावण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हा परिषदेकडून ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीच्या हद्दीत किती हायमास्ट बसविण्यात आले असून त्यापैकी किती हायमास्ट ला स्वतंत्र विद्युत जोडणी घेण्यात आलेली आहे,

(३) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने सदर हायमास्ट बेकायदेशीरपणे विद्युत कनेक्शन घेऊन लावण्यात आल्याबाबत संबंधीतावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०५-०७-२०२२) : (१) हे खरे नाही.

ठाणे जिल्हा परिषदेने ग्रामीण भागातील ग्रामपंचायत हद्दीत १५ व्या वित्त आयोगांतर्गत हायमास्ट लावण्यात आले असून सदर हायमास्टसाठी स्वतंत्र वीज कनेक्शन नसून संबंधित ग्रामपंचायतीच्या मंदिर, पथदिवे, समाज मंदिर इ. च्या वीज मीटर मधून हायमास्टसाठी विद्युत जोडणी देण्यात आली आहे. संबंधित वीज मीटर हे ग्रामपंचायतीच्या नावे असल्यामुळे देण्यात आलेले कनेक्शन हे बेकायदेशीर नाही.

(२) प्रश्न उदभवत नाही.
(३) प्रश्न उदभवत नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील गुंजवणी धरणाच्या मूळच्या मंजूर कालव्याबाबत.

(४६) ४२४०३ (०६-०४-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर (जि.पुणे) तालुक्यासाठी वरदान ठरणाऱ्या गुंजवणी धरणाच्या मूळच्या मंजूर शासनाने केलेल्या खुल्या प्रवाही कालव्याचा सर्व्हे वाल्हे व वाल्हे गावचे विभाजन होवून नव्याने अस्तित्वात आलेल्या आडाचा वाडी, वागदरवाडी, सुकलवाडी गावच्या पश्चिम-उत्तर दिशेच्या मार्गाने जाणारा असल्याचे तेथील स्थानिक शेतकऱ्यांचे मत आहे, हे खरे आहे काय,
(२) वाल्हे, पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील गुंजवणी धरणातून वाल्हेसह परिसराला बंद असलेल्या पाईपलाईनमधून पाणी पुरवठा करण्यासाठी गावाचा संपूर्ण शेती सिंचनाखाली येण्यासाठी कंत्राटदार कंपनीने उक्त सर्व्हे हा हवाई व नकाशाप्रमाणे तसेच शिवाराचा विचार न करता अधिकाऱ्यांनी मर्जीनुसार सर्वेक्षण केल्याने शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करुन त्याविरोधात ग्रामसभा घेऊन काम बंद आंदोलन केल्याचे दिनांक १५ जानेवारी,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) तसेच, जनाई शिरसाई व पुरंदर उपसा सिंचन योजनेतून दौंड तालुक्यातील दक्षिणेकडील काही गावांना पाणी पुरवठा करण्याचे नियोजित असून काही तांत्रिक अडचणीमुळे ही पाणी पुरवठा पूर्ण क्षमतेने चालत नाही हे खरे आहे काय,
(४) दौंड तालुक्यातील अनेक तलाव या योजनेपासून वंचित असून या योजनेच्या फेरसर्वेक्षणाची मागणी मा. लोकप्रतिनिधीनी दिनांक १७.०१.२०२१ रोजी मुख्य अभियंता जलसंपदा विभाग पुणे यांचेकडे झालेल्या बैठकीत केली आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त ठिकाणची उक्त शेती सिंचनाखाली येण्यासाठी फेरसर्व्हेक्षण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१५-०६-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे आडाची वाडी, वागदरवाडी हि गावे गुंजवणी प्रकल्पाच्या मूळ अहवालामध्ये समाविष्ट नाहीत. तथापि मौजे सुकलवाडी या गावाचा समावेश मंजूर प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये आहे. सद्य:स्थितीत सदरील गावाच्या स्थानिक शेतकऱ्यांनी गावाच्या पश्चिम-उत्तर दिशेने बंद पाईपलाईन जावी अशी मागणी केली आहे.

(२) हे खरे नाही.

कंत्राटदार कंपनीने सदर बंद पाईपलाईनचा क्षेत्रिय सर्व्हे हा धरण क्षेत्रापासून ते बंद पाईपलाईनच्या लाभक्षेत्रातील शेवटच्या गावापर्यंत (मौजे राख, ता. पुरंदर) केला असून सदर सर्व्हे हा प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर जाऊन करण्यात आला आहे. द्वितीय सुधारित प्रकल्प अहवालानुसार व कंत्राटदार कंपनीने सादर केलेल्या सर्व्हेनुसार गुंजवणी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील सर्व गावे सदर योजनेत समाविष्ठ करण्यात आल्याची खातरजमा करण्यात आली आहे. सदर सर्वेक्षण व संकल्पन आयआयटी, हैद्राबाद व मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडून मुल्यार्पित करण्यात आले आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

खडकवासला प्रकल्पाच्या प्रकल्पीय पाणी वापर तरतूदीनुसार सिंचनासाठी २२.५५ टी.एम.सी. ची तरतूद आहे. जनाई-शिरसाई उपसा सिंचन योजना ही पुर्णतः खडकवासला धरणातून मिळणा-या पाण्यावरच अवलंबुन आहे. खडकवासला धरणातून जनाई उपसा सिंचन योजनेसाठी २.१७ टी.एम.सी. व शिरसाई उपसा सिंचन योजनेसाठी १.४३ टी.एम.सी. असे एकूण ३.६० टी.एम.सी. पाण्याची तरतूद करण्यात आली आहे. पुणे महानगरपालिकेसाठी (पुणे शहराच्या

पिण्यासाठी) ८.३० टी.एम.सी. तरतूद आहे. परंतू पुणे शहराचा प्रत्यक्ष पाणी वापर हा प्रकल्प तरतूदीपेक्षा जास्त आहे. पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य असल्याने सिंचनास कमी पाणी उपलब्ध राहते. त्यामुळे जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेला प्रकल्प तरतूदीनुसार पाणी उपलब्ध होत नाही. उपलब्ध होणारे पाणी समन्यायी तत्वावर सर्व गावांना देण्यात येते. तसेच सदर योजनेच्या कालव्यांचे अस्तरीकरण झाले नसल्याने पाण्याचा पाझर मोठ्या प्रमाणात होतो. खडकवासला धरणातुन कमी अधिक प्रमाणात उपलब्ध होणाऱ्या पाण्यामधुनच सिंचन करण्यात येते. त्यामुळे दौंड तालुक्यातील दक्षिणेकडील काही गावांना पाणी पुरवठा पूर्ण क्षमतेने करता येत नाही.

पुरंदर उपसा सिंचन योजनेचा जलस्त्रोत मुळा-मुठा नदीवर मौजे कोरेगाव मुळ येथील को. प. बंधारा भिवरी येथे असून योजनेचा वार्षिक पाणी वापर ४.०० टी.एम.सी. आहे व सिंचन २५४९८ हे. आहे. मुळा मुठा नदीवरील पुणे शहराच्या सांडपाण्याचे उचल करून पुणे जिल्ह्यातील अवर्षणप्रवण भागातील हवेली (पुर्व भाग), दौंड, पुरंदर व बारामती तालुक्यातील २५९४८ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्यात येतो.

पुणे महानगरपालिकेच्या दैनंदिन १७८७ एमएलडी पाणी वापराच्या ८०% परिमाणाप्रमाणे सांडपाणी (१४३० एमएलडी) निर्माण होते. त्यापैकी ५०० एमएलडी सांडपाणी जुना मुठा उजवा कालव्यात सोडण्यात येते व ३५० एमएलडी सांडपाणी पुरंदर उपसा सिंचन योजनेद्वारे उपसा करून वापरण्यात येते. उर्वरित सांडपाणी मुळा-मुठा नदीद्वारे स्थानिक शेतकऱ्यांमार्फत खाजगी उपसा सिंचनाद्वारे वापरण्यात येते. त्यामुळे पुरंदर उपसा सिंचन योजनेस नियोजनाप्रमाणे पाणी उपलब्ध होते. दौंड तालुक्यातील डाळीब, बोरी ऐदी, बोरी भडक, जावजेबुवाचीवाडी, भरतगाव, कासुर्डी, यवत, भांडगाव, वाखारी व केडगाव या दहा गावांना सिंचनासाठी मागणीप्रमाणे पाणी देण्यात येते.

(४) होय.

(५) जनाई प्रकल्पाचे मूळ मंजूर प्रकल्पिय अहवालामध्ये एकूण ६५ तलावांचा समावेश असून त्यापैकी ४५ तलावांना सद्य:स्थितीत पाणी सोडण्यात येते. उर्वरीत २० तलावांना तांत्रिक बाबींमूळे पाणी देता येत नाही. त्यापैकी जनाई उपसा सिंचन योजनेतील मंजूर प्रकल्पीय अहवालातील १८ समाविष्ट तलावांपैकी सद्य:स्थितीत योजनेद्वारे १३ तलाव भरण्यात येते व ५ तलाव भरता येत नाही. तसेच शिरसाई उपसा सिंचन योजनेतील मंजूर प्रकल्पीय अहवालातील ४७ समाविष्ट तलावांपैकी सद्यस्थितीत योजनेद्वारे ३२ तलाव भरण्यात येते व १५ तलाव भरता येत नाही. मा. लोकप्रतिनिधी यांनी मागणी केल्यानुसार मंजूर प्रकल्प अहवालातील ज्या तलावांना पाणी सोडता येत नाही त्याबाबत उपाय योजना काय करता येईल याचा अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर सर्व्हेक्षण पूर्ण झालेनंतर त्याबाबत सक्षम स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र सरकारच्या जिल्हा ग्रामीण विकास योजना यंत्रणेबाबत

(४७) ४२५७१ (०७-०४-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र पुरस्कृत योजनेच्या अंमलबजावणीसाठी सध्या राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये कार्यरत असलेल्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा हे विभाग कायमस्वरुपी बंद करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असल्याचे माहे २३/१०/२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विभाग बंद झाल्यास केंद्राच्या आणि ग्रामीण विकासासाठीच्या योजनांची अंमलबजावणी कधी व कोणत्या यंत्रणेद्वारे करावे असा संभ्रम निर्माण झाला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच या योजनेच्या अंमलबजावणी व देखरेखीसाठी स्वंतत्र आयुक्त असावे अशी ही मागणी पुढे आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (२८-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
ग्राम विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या दिनांक ०१/११/२०२१ च्या पत्रान्वये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जिल्हा परिषद मध्ये विलिन करुन दिनांक १ एप्रिल, २०२२ पासून बंद करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(२) नाही,
दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी मा. मंत्रीमंडळ बैठकीमध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा योजना बंद करण्याऐवजी राज्य शासनाकडून १००% राज्य योजना म्हणून पुढील पाच वर्षापर्यंत सुरु ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

बाभुळगाव (जि.यवतमाळ) येथील बेंबळा धरणाची साठवण क्षमता कमी केल्याने सदर परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या संपादीत केलेल्या जमिनी खाली झाल्या असल्याबाबत

(४८) ४३२५५ (११-०४-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाभुळगाव (जि.यवतमाळ) येथील बेंबळा धरणाची साठवण क्षमता कमी केली असल्याने दाभा, पहुर, मालापुर, नागरगाव, या परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या संपादीत केलेल्या जमिनी खाली झाल्या असल्याने सदर जमिनी वनविभागाला देण्याची कार्यवाही जलसंपदा विभागाचे अधिकारी करित असल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास शेतकऱ्यांच्या शेतजमिनी या पाणी साठवणूक करिता न्याय हक्क अबाधीत राहून संपादीत करण्यात आल्या होत्या परंतू शेतकऱ्यांना विचारात न घेता जमिनी वनविभागाला देण्याच्या निर्णयाला परिसरातील शेतकरी यांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर परिसरातील शेतकरी यांनी दिलेल्या तक्रारी वरून परिसरात पशू जनावरापासून दरवर्षी शेती पिकाचे नुकसान होते शेतकरी यांनी शेतजमिनी भाडे तत्वावर देण्याबाबत विनंती केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२९-०६-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.
यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा प्रकल्पाची फेरनियोजना नुसार प्रकल्पाची साठवण क्षमता कमी करण्यात आलेली आहे. प्रकल्पाचे अतिरिक्त ठरत असलेले क्षेत्र सामाजिक वनीकरण व पर्यायी वनीकरण, सौर उर्जा प्रकल्प करिता वापरण्याचे सुचना आहेत.
सदर अतिरिक्त जमीनी पैकी पहुर-२ व दाभा या गावठाणातील एकुण ३१५.१७ हे जमीन आसोलामेंढा प्रकल्पाचे बुडित क्षेत्र तथा कालव्याच्या कामाकरिता पर्यायी वनीकरणा करिता वनविभागाला वळती करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(२) अंशत: खरे आहे.
सदर जमीन हि बेंबळा नदी प्रकल्पा करिता संपादित करण्यात आलेली आहे. या जमीनीची मालकी जलसंपदा विभागाची आहे. शासनाचे पत्र क्र. संकिर्ण -०७१८/ १०८९/ प्र. क्र. ३३८/ मोप्र - २/ दि. १२.०९.२०१८ अन्वये प्रकल्पाचे फेररचना व समरुपता नुसार अत्तिरिक्त ठरत असलेली जमीन पर्यायी वनीकरन करिता वापरण्याचे सुचना आहेत.
त्यानुसार मा. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ यांचे पत्र क्र. ८९७/विपाविम./ कांता- १/ धा. क्र. ०६/ दि. ०४.०२.२०२१ नुसार सदर अतिरिक्त जमीनी पैकी ३१५.१७ हे जमीनीमधुन आवश्यक जमीन आसोलामेंढा प्रकल्पाचे

बुडित क्षेत्र तथा कालव्याच्या कामाकरिता आवश्यक पर्यायी वनीकरणा करिता जमीन वळती करण्याच्या सुचना आहेत. मौजा दाभा व पहुर-२ मधील काही शेतकऱ्यांचा सदर बाबीस काही अंशी विरोध होत आहे.
(३) हे खरे नाही.
सद्यस्थिती पर्यंत सदर जमीन भाडेतत्वावर देण्याबाबत कोणताही अर्ज या कार्यालयास प्राप्त नाही.
(४) आवश्यकता नाही.
(५) लागु नाही.

खडक सावंगा पुनर्वसन (ता.बाभुळगाव जि.यवतमाळ) येथील दर्जेदार पुनर्वसन अंतर्गत मंजूर कामे निकृष्ट दर्जाची केली असल्याबाबत

(४९) ४३२७२ (११-०४-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकसावंगा पुनर्वसन (ता.बाभुळगाव जि.यवतमाळ) पुनर्वसतीत गावातील दर्जेदार पुनर्वसन अंतर्गत नाली, रस्ते इत्यादी कामे आराखडयानुसार सन २०१७ वर्षामध्ये मंजूर करण्यात आली होती परंतु कंत्राटदारांने नालीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केले असल्याने नालीच्या बांधकामाला जागोजागी तडे गेले असल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी च्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुनर्वसना अंतर्गत बेंबळा प्रकल्पातील पुनर्वसीत गावात कामे करण्यात आली त्या कामावर संबंधीत विभागाच्या अधिकारी यांचे दुर्लक्ष केले असल्याने कत्राटदारांने कामामध्ये अनियमितता केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्‌अनुषंगाने संबंधीत विभागाच्या अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील (२९-०६-२०२२) : (१) हे, अंशत: खरे आहे.
खडकसावंगा पुनर्वसन (ता.बाभुळगांव जि.यवतमाळ) गावातील दर्जेदार पुनर्वसन अंतर्गत नाली, रस्ते इत्यादी कामे आराखडयानुसार सन २०१७ वर्षामध्ये मंजूर करण्यात आली. कंत्राटदाराने केलेल्या नालीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे नसल्याचे तसेच सदर बांधकामास कुठल्याही प्रकारचे तडे गेले नसल्याचे प्रत्यक्ष पाहणी अंती आढळून आले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ पंचायत समिती गट विकास अधिकारी पदाचा प्रभार नियमबाह्यरित्या सोपविण्यात आलेबाबत

(५०) ४३५१७ (३१-०३-२०२२). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी पदाचा अतिरिक्त प्रभार श्री. सुभाष मानकर यांच्याकडे सोपविण्यात आला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यवतमाळ जिल्हा परिषदेने यवतमाळ पंचायत समितीत सहाय्यक गटविकास अधिकारी कार्यरत असताना गटविकास अधिकारी पदाचा प्रभार इतर पंचायत समितीतील अधिकाऱ्याकडे सोपविताना शासनाची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यानुसार मान्यता घेण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त पदाचा प्रभार नियमभंग करून बेकायदेशीररित्या सोपविल्या प्रकरणी संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१०-०६-२०२२) : (१) होय.
(२) जिल्हा परिषद, यवतमाळ अंतर्गत गट विकास अधिकारी चे एकूण १६ पदे मंजूर असून त्यापैकी ५ पदे भरलेली आहेत. सहायक गट विकास अधिकारीचे १५ पदे मंजूर असून त्यापैकी ९ पदे भरलेली आहेत. श्री. ज्ञानेश्वर टाकरस, सहा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, यवतमाळ यांचेकडे दिनांक ०४.११.२०२० ते दिनांक ०७.१२.२०२१ पर्यंत गट विकास अधिकारी पदाचा संपूर्ण प्रभार होता. तथापि, श्री. टाकरस यांच्या विरुध्द प्राप्त तक्रारी व त्यांनी अतिरिक्त पदभार काढून घेण्याबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने श्री. टाकरस यांच्या कडील अतिरिक्त कार्यभार श्री. मानकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती कळंब यांचेकडे सोपविण्यात आला.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ च्या तरतुदीनुसार अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबत कोणतेही शासन आदेश/धोरण नाहीत. म.ना.से.(वेतन) नियम १९८१ मधील नियम ५६ नुसार शासकीय कर्मचाऱ्यांकडे त्याच्या स्वत:च्या पदाव्यतिरिक्त दुसऱ्या पदाचा कार्यभार सोपविण्यात येतो. असा दुसऱ्या पदाचा पदाचा अतिरिक्त कार्यभार एकाच प्रशासकीय सोय व निकड लक्षात घेऊन त्याच कार्यालयातील,त्याच संवर्गातील सर्वात सेवाज्येष्ठ, अनुभवी व कार्यक्षम अधिकारी सोपविण्यात यावा.जेथे असे अधिकारी उपलब्ध नसतील तेथे संबंधित पदाला लागत असलेल्या निम्न संवर्गातील सर्वात ज्येष्ठ अधिकारी यांना कार्यभार देण्यात यावा.

त्यानुसार श्री.मानकर यांच्याकडे अतिरिक्त पदाचा कार्यभार सोपविण्यात आला होता. श्री.मानकर यांच्याकडे पंचायत समिती, कळंब व इतर २ पंचायत समितींचा कार्यभार असल्याने कामाचा व्याप वाढल्याने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, यवतमाळ चा अतिरिक्त कार्यभार काढण्यात यावा याबाबत विनंती अर्ज सादर केल्यानुसार दिनांक ०४.०३.२०२२ अन्वये श्री. टाकरस यांच्याकडे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, यवतमाळ या पदाचा कार्यभार सोपविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

विधान भवन : **राजेन्द्र भागवत**
नागपूर. **प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.